- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,५८,७०० /-
✔ २३ कॅरेट : १,५६,३५० /-
✔ चांदी : २,७८,३०० /-

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, ४ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २३६ | किंमत : २ रूपये

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# बिहारमध्ये बालेकिल्ल्याला सुरुंग, भाजपला मोठा धक्का

**वृत्तसंस्था, बांकीपूर/दतिया**
देशात कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन झाल्याने सामान्यांमध्ये सत्ताधाऱ्यांमध्ये रोष निर्माण झालेला असतानाच देशात बिहारसह काही राज्यांत विधानसभेची पोटनिवडणूक लागली. यात बिहारमधील बांकीपूरची निवडणूक सर्वाधिक चर्चेत राहिली. कारण हा भाजपचा बालेकिल्ला होता. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांचा गड असलेल्या या मतदारसंघात भाजपचा दारुण पराभव झाला. येथे जनसुराज्यचे प्रशांत किशोर विजयी झाले. यासोबतच मध्य प्रदेशातही भाजपला एक जागा गमवावी लागली. फक्त गुजरातमध्ये त्यांना विजय साकारता आला. त्यामुळे भाजपसाठी हा फार मोठा धक्का मानला जात आहे.



बिहारमधील बांकीपूर विधानसभा मतदातसंघातील पोटनिवडणुकीत जनसुराज्य पक्षाचे प्रमुख प्रशांत किशोर यांनी भाजपला मोठा धक्का देत सनसनाटी विजय मिळवला. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या परंपरागत मतदारसंघात प्रशांत किशोर यांनी भाजपाचे उमेदवार निरज कुमार यांच्यावर १९ हजारांहून अधिक मतांचे मताधिक्य घेत विजय मिळवला.

भाजपासाठी प्रतिष्ठेच्या असलेल्या या पोटनिवडणुकीत जनसुराज्य पक्षाचे प्रमुख प्रशांत किशोर यांनी चांगलीच रंगत आणली. या मतदारसंघात भाजप, राजद आणि जनसुराज्य या पक्षांत तिरंगी लढत झाली. मतदानानंतर आज मतमोजणी झाली. यात प्रशांत किशोर यांनी सुरुवातीपासून आघाडी मिळवली. ३२ व्या फेरीअखेर प्रशांत किशोर यांनी आपली आघाडी १९ हजारांहून अधिक वाढवत आपला विजय निश्चित केला.

**मध्य प्रदेशात काँग्रेसचे घनश्याम सिंह विजयी**

भाजपाची सत्ता असलेल्या मध्य प्रदेशात काँग्रेसने सत्ताधारी भाजपाला मोठा धक्का दिला. दतिया विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार घनश्याम सिंह यांनी भाजपाच्या आशुतोष तिवारी यांना धूळ चारली. पहिल्या फेरीत तिवारी यांनी आघाडी घेतली होती. मात्र नंतर काँग्रेसचे उमेदवार घनश्याम सिंह यांनी आघाडी घेतली आणि ६ हजार १६ मतांनी दणदणीत विजय मिळविला.

**गुजरातमध्ये भाजप विजयी**

गुजरातमधील वडोदरा जिल्ह्यातील मांजळपूर विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार सतेंद्रभाई पटेल उर्फ सतीश पटेल यांनी ३०,६३० मतांच्या मोठ्या फरकाने विजय मिळवला. या निवडणुकीत सतीश पटेल यांना ५५,४८१ मते मिळाली तर काँग्रेसचे उमेदवार भीखा रबारी यांना २४,८५१ मते मिळाली.

# इंधनावरील कर वाढविला

## तेल कंपन्यांवर भार, पेट्रोलवर ३.५, डिझेलवर २४ रुपये कर

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर कमी झाले. याचा थेट ग्राहकांना फायदा करून देण्याऐवजी केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या निर्यातींवरील विंडफॉल टॅक्समध्ये वाढ केली. यामुळे पेट्रोलच्या निर्यातींवरील विंडफॉल टॅक्स २.५० रुपयांवरून ३.५० रुपये प्रतिलिटर करण्यात आला तर डिझेलच्या निर्यातींवरील विंडफॉल टॅक्स १५.५० रुपयांवरून २४ रुपये प्रतिलिटर करण्यात आला. या टॅक्सवाढीचा फटका थेट कंपन्यांना बसणार आहे. त्यामुळे पेट्रोल, डिझेलचे दर जैसे थे राहतील, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

कच्च्या तेलाच्या किंमती घसरल्यामुळे देशाचा महसूल वाढविण्यासाठी शासनाकडून पेट्रोल-डिझेलसह एटीएफवरही (विमानांचे इंधन) एक्साइज ड्युटी वाढविण्यात आली आहे. जेव्हा एटीएफवर एखादा कर वाढतो, तेव्हा त्याचा परिणाम म्हणून विमानांचे तिकिटही वाढते. परंतु शासनाने वाढवलेली एक्साइज ड्युटी ग्राहकांवर न लादता कंपन्या स्वतः हा भार उचलणार आहेत. त्यामुळे पेट्रोल-डिझेल किंवा एटीएफच्या किरकोळ किंमतीवर या करवाढीचा फारसा परिणाम जाणवणार नाही.

भारत सरकारने पेट्रोलच्या एक्साइज ड्यूटीवर एकूण १ रुपयांची वाढ केली. आधी २.५ रुपये प्रतिलिटर एक्साइज ड्युटी आकारण्यात येत होती त्या रकमेत वाढ करून आता ३.५ रुपये प्रतिलिटर आकारण्यात येत आहे तर भारत सरकार सर्वांत जास्त एक्साइज ड्युटी डिझेलवर आकारत आहे. आधी डिझेलवर १५.५ रुपये प्रतिलिटर एक्साइज ड्युटी आकारण्यात येत होती. आता त्यात ८.५ रुपयांची वाढ करून ती रक्कम २४ रुपये प्रतिलिटर करण्यात आली तर एटीएफ इंधनावर २२ रुपये प्रतिलिटर एक्साइज ड्युटी आकारण्यात येत आहे. याआधी १४.५ रुपये प्रति लिटर एक्साइज ड्युटी आकारण्यात येत होती.

### थोडक्यात

## युरोपात घुसखोरांना नो एंट्री

**माद्रिद/लंडन :** स्पेनमधील सेउता येथे निर्माण झालेल्या घुसखोरीच्या संकटामुळे युरोपचे राजकारण तापले आहे. युरोपियन युनियनमधील (ईयू) २७ पैकी २२ देशांनी बॉर्डर प्लॅन बदलण्याची आणि सीमेवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. यामध्ये इटली, ब्रिटन, जर्मनी यांसारख्या देशांचा समावेश आहे. मंगळवारी २७ देशांचे गृहमंत्री घुसखोरांच्या नो एंट्री प्लॅनवर चर्चा करतील. हा प्लॅन ६ स्तरांवर तयार केला जाऊ शकतो. स्पेनसह ५ देशांनी २२ देशांच्या या प्लॅनवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, स्पेनमधील मूलगामी विचारसरणीचे पक्ष याला परदेशी आक्रमण म्हणत आहेत. फ्रान्स, जर्मनी, ब्रिटनमध्ये हकालपट्टीची मागणी तीव्र झाली. फ्रंटेक्सनुसार २००९ ते २०२५ दरम्यान (१७ वर्षे) चार सागरी मार्गांवर ३५.२५ लाख बेकायदेशीर प्रवाशांच्या एंट्रीची नोंद झाली. पूर्व भूमध्यसागरीय मार्ग, मुख्यत्वे ग्रीस आणि सायप्रसच्या दिशेने, १७.८१ लाख. लीबिया-ट्युनिशियातून इटली आणि माल्टा पोहोचणाऱ्या मध्य भूमध्यसागरीय मार्गावर १३.०३ लाख. मोरोक्को-अल्जेरियातून स्पेनला जाणाऱ्या पश्चिम भूमध्यसागरीय मार्गावर २.६५ लाख आणि अटलांटिक-कॅनरी मार्गावर १.७६ लाख

# जॉब नहीं मिलेगा, तो सिंहासन हिलेगा : राहुल गांधी

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
एकीकडे बिहारमध्ये प्रशांत किशोर यांनी भाजपला धक्का देत पोटनिवडणुकीत मोठा विजय मिळवला आहे. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या होमग्राऊंडवरच त्यांनी त्या पक्षाच्या उमेदवाराचा पराभव केला. त्याचवेळी काँग्रेसचे नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे एक ट्वीट चांगलंच चर्चेत आले आहे. जॉब नहीं मिलेगा, तो सिंहासन हिलेगा, अशा आशयाचे ट्वीट राहुल गांधी यांनी केले आहे.




नुकतंच झालेल्या दिल्लीतील जंतरमंतरवरील आंदोलनामुळे विद्यार्थ्यांची ताकद देशाला दिसून आली. आता त्याच विद्यार्थ्यांचे प्रश्न घेऊन राहुल गांधीही मैदानात उतरले आहेत. येत्या ८ ऑगस्ट रोजी राहुल गांधी हे उत्तर प्रदेशातील प्रयागराज या ठिकाणी आंदोलन करणार आहेत. रोजगाराच्या मुद्द्यावर ते आंदोलन करणार असून या मध्ये तरुणांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केलं. त्याचवेळी जॉब नहीं मिलेगा, तो सिंहासन हिलेगा असा इशारा त्यांनी उत्तर प्रदेश सरकार आणि केंद्र सरकारला दिला आहे.

राहुल गांधी यांनी त्यांच्या ट्वीटमध्ये म्हटले आहे की, कोटा, देहराडून नंतर आता प्रयागराजमध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलन करण्यात येईल. दरवर्षी लाखो युवक परीक्षांचे फॉर्म भरतात, त्याची फी देतात आणि निकालाची वाट पाहतात. पण पेपरफुटीमध्ये त्यांचे नुकसान झाले आहे. थांबलेल्या भरती प्रक्रियेमुळे त्यांच्या भविष्य धोक्यात आले आहे. विद्यार्थी त्यांच्या अधिकारांची मागणी करतात म्हणून दिल्ली पोलिसांनी त्यांच्यावर लाठीचार्ज केला, त्यांच्यावर पेलेटगनचा हल्ला केला. या प्रश्नावर आम्ही सातत्याने आवाज उठवू आणि विद्यार्थ्यांना न्याय देऊ. जबाबदारी घ्या किंवा सत्ता सोडा असा इशारा त्यांनी दिला.

# मद्यपींना मोठा धक्का, Old Monk, Bagpiper आणि RC सह इतर ब्रँडवर बंदी

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
अन्न सुरक्षा नियामकने ओल्ड मोंक, एंटीक्विटी ब्लू व्हिस्की, रॉयल चॅलेंज व्हिस्की आणि बॅगपाइपर डीलक्स व्हिस्की सारख्या नामांकित दारुच्या ब्रँडसच्या काही वेरियंटसवच्या विक्रीवर बंदी घातली आहे. दारुमध्ये आर्टिफिशिअल फ्लेवर आढळले जे निश्चित उत्पादन मानकांनुसार नव्हते.

फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स अथॉरिटी ऑफ इंडियाने म्हटलं की त्यांना चौकशीत आढळलं की डियाजियो इंडियाच्या यूनाइटेड स्पिरिट्स, इनब्रू बेवरेजेज आणि मोहन रॉकी स्प्रिंगवॉटर द्वारे बनवलेल्या काही उत्पादनांच्या दारु सारखी चव आणि गंध आणण्यासाठी बाहेरील आर्टिफिशिअल किंवा नेचर आयडेंटिकल फ्लेवरचा वापर केला गेला. मात्र, त्यासाठी प्राकृतिक साहित्य आणि योग्य प्रकारे मॅच्युअर करण्याची प्रक्रिया करणं आवश्यक होतं.

एफएसएसएआयनं मध्य प्रदेशातील यूनाइटेड स्पिरिट्सच्या एंटीक्विटी ब्लू व्हिस्की आणि रॉयल चॅलेंज व्हिस्की, इनब्रू बेवरेजेज ची बॅगपाइपर डीलक्स व्हिस्की आणि ओल्ड कास्क डीलक्स रमच्या विक्रीस मनाई केली आहे. महाराष्ट्रात मोहन रॉकी स्प्रिंगवॉटर यांच्याकडून बनवल्या जाणाऱ्या ओल्ड मंकच्या तीन वेरियंटवर बंदी घालण्यात आली आहे.

# २५ हजार मूळ वेतन असणाऱ्यांना पेन्शन मिळणार!

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
ईपीएफओ अतंर्गत ईपीएफच्या पगाराची मयार्दा वाढविण्याच्या प्रस्तावाला वित्त मंत्रालयाकडून मंजुरी देण्यात आली. १५ हजार रुपयांवरुन ती रक्कम २५ हजार रुपये करण्याचा निर्णय केंद्र सरकारच्या कॅबिनेटने मंजुरी दिल्यानंतर तो लागू होईल. अजून या निर्णयाला केंद्रीय कॅबिनेटची मंजुरी मिळणे बाकी आहे.

ईपीएफओच्या नियमांनुसार ज्या कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन १५ हजार रुपयांपर्यंत असते, त्यांना पीएफ कॉन्ट्रिब्यूशन अनिवार्य असते. १५ हजारांपेक्षा अधिक मूळ वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्यांना हा नियम लागू नसतो. मात्र, केंद्रीय वित्त मंत्रालयाकडून याची मयार्दा २५ हजार रुपये करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे मोठ्या संख्येने नोकरदार लोक ईपीएफ आणि पेन्शनच्या कक्षेत येतील.

केंद्रीय वित्त मंत्रालयाकडून ईपीएफओच्या पगाराची मर्यादा वाढविण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. यात १५ हजार रुपयांच्या मूळ वेतनाची मयार्दा वाढवून




२५ हजार रुपये पगार असणाऱ्यांना पीएफ आणि पेन्शनच्या कक्षेत आणण्याची तयारी करण्यात आली आहे. सुरुवातीला ही मर्यादा ३० हजार रुपये करण्याचा विचार होता. मात्र, वित्त मंत्रालयाकडून ही मयार्दा २५ हजार रुपये करण्यास मंजुरी देण्यात आली. आता कॅबिनेटच्या बैठकीत मंजुरी मिळाल्यानंतर हा निर्णय लागू करण्याची तारीख जाहीर केली जाऊ शकते.

मनीकंट्रोलच्या रिपोर्टनुसार सरकारने ईपीएफओ पगाराची मयार्दा वाढविल्यास त्याचा आर्थिक भार वाढू शकतो. कर्मचाऱ्यांच्या पीएफ आणि पेन्शन फंडमध्ये कंपनीसोबत सरकारही कॉन्ट्रिब्यूशन करत असतं. ईपीएसमध्ये एम्पलॉयर मूळ वेतनाच्या ८.३३ टक्के तर केंद्र सरकार १.१६ टक्के योगदान देते. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी केंद्र सरकारने ११९४४ कोटींचा प्रस्ताव ठेवला होता. हा नियम २० पेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या कपन्यांना लागू होतो.

**प्रस्ताव तातडीने लागू होणे अशक्य**

कॅबिनेटनेही वित्त मंत्रालयाचा प्रस्ताव मंजूर केला तर हा प्रस्ताव तातडीने लागू होण्याची शक्यता कमी आहे. कारण कंपन्यांना त्यांच्या पेरोल सिस्टीम्स, कंम्लायन्स प्रोसेस आणि दुसऱ्या आवश्यक कामांमध्ये बदल करण्यासाठी वेळ लागेल. त्यामुळे सरकार नव्या नियमाची अंमलबजावणी करण्यासाठी वेळ देऊ शकतो.

**या आधी २०१४ मध्ये वाढविली होती मर्यादा**

सरकार नव्या ईपीएफ पगाराच्या मर्यादेची अंमलबजावणी १ एप्रिल २०२७ पासून लागू करु शकते. ईपीएफओकडून सप्टेंबर २०१४ मध्ये ईपीएफ पगाराची मयार्दा ६५०० रुपयांवरून वाढवून १५ हजार रुपये केली होती. ती आता वाढवली जाण्याची शक्यता आहे.

# मुंडेंच्या वक्तव्यावर नागपुरच्या सावजी चालकांचा निषेध

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सावजी मटणासंदर्भात केलेल्या विधानावरुन नवा वाद रंगलाय. सावजी जेवण जर माज्यासारख्या माणसांनी जेवला तर किमान एक महिना हॉस्पिटलमध्ये जाईल, असं विधान तुकाराम मुंढेंनी केलं होतं. सावजी मटण हा नागपुरकरांसाठी केवळ एक खाद्यपदार्थ नाही, तर अस्मिता आणि परंपरा आहे आणि याच खाद्यसंस्कृतीसंदर्भात तुकाराम मुंढेंनी विधान केल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

सावजीसारखं ऑईली फूड खाल्लं तर तुम्हाला हार्ट अटॅक येणार नाही, तर दुसरं काय होईल, असं म्हणत तुकाराम मुंढेंनी खाण्याच्या सवयी बदलण्याचा सल्ला दिला होता. आता तुकाराम मुंढेंनी सावजी मटणबाबत केलेल्या विधानावरुन सावजी हॉटेल चालकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

नागपुरात जवळपास १ हजार सावजी हॉटेल आहेत. एका हॉटेलमध्ये २०० लोक जेवतात. सावजी आरोग्यासाठी चांगलं नसतं, तर नागपुरातील सर्व रुग्णालये भरली असती. तसेच रुग्ण रसत्यावर दिसून आले असते. सावजी हा ब्रँड आहे. सावजीमुळे कुणालाही इजा होता नाही, असं एका सावजी हॉटेल चालकाने सांगितले. तर कदाचित स्वतःच्या प्रसिद्धीसाठी तुकाराम मुंढे असं विधान करु शकतात. नागपूर शहरात आज हजार सावजी भोजनालय आहे. तुम्ही रोज रात्री फेरफटका मारुन बघा...तुम्हाला सावजी भोजनालय नेहमी फुल्ल दिसेल, असं सावजी हॉटेल चालकाने सांगितले.

तसेच मी तुकाराम मुंढेंच्या घरी येऊन सावजी बनवून दाखवतो किंवा तुकाराम मुंढेंनी आमच्या घरी येऊन सावजी खावी...मी तुकाराम मुंढेंच्या विधानाचा निषेध करतो. त्यांच्या या विधानामुळे सावजी समाजाचा घात होऊ शकतो. म्हणून मी तुकाराम मुंढेंचा निषेध करतो, असं एक सावजी चालक म्हणाला. तुकाराम मुंडे यांच्या वक्तव्याने नागपुरकर सावजी प्रेमी निश्चित दुखावले आहे. तुकाराम मुंडे यांनी मूळ सावजी पदार्थाची चव घेऊन मत व्यक्त करण्याची विनंती त्यांनी केली आहे. यावर आता तुकाराम मुंडे काय भूमिका हे बघावे लागणार आहे.



संपादकीय लेखणीतून...

# डोवाल सोहळा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात भारताचे परराष्ट्र आणि सुरक्षा धोरण अत्यंत कणखर बनले आहे. यात राष्ट्रीय सल्लागार अजित डोवाल यांच्या धोरणात्मक निर्णयांचा सगळ्यात मोठा वाटा आहे, असे गौरवोद्गार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काढले. अजित डोवाल यांना पुण्यात आयोजित सोहळ्यात लोकमान्य टिळक ट्रस्टच्या वतीने दिला जाणारा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शहा म्हणाले की, डोवाल हे भारताचे आजवरचे सर्वाधिक काळ सेवा बजावणारे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार ठरले असून भारतीय सैन्याचे आधुनिकीकरण करणे, लष्करामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे आणि कठीण प्रसंगात कठोर निर्णय घेणे यात त्यांचा अनुभव नेहमीच मोलाचा ठरला आहे. डोवाल यांनी दिलेल्या मार्गदर्शनामुळे केवळ अहमदाबादमधीलच नव्हे, तर देशभरातील १३ बॉम्बस्फोटांच्या प्रकरणांचा एकाच वेळी उलगडा करण्यात गुजरात पोलिसांना यश आले होते. आयपीएस अधिकारी असलेले अजित डोवाल यांनी आपल्या सेवेच्या सुरुवातीलाच केरळ केडर सोडून गुप्तचर विभागात दाखल होण्याचा अत्यंत धाडसी निर्णय घेतला होता. पाकिस्तानात सलग सहा वर्षे अत्यंत गुप्तपणे वास्तव्य करून त्यांनी भारतासाठी जी महत्त्वाची माहिती गोळा केली, ती देशाच्या सुरक्षेसाठी ऐतिहासिक ठरली. देशाच्या अंतर्गत सुरक्षेचा मजबूत कणा मानल्या जाणाऱ्या मल्टी एजन्सी सेंटर या संस्थेची स्थापना डोवाल यांनीच केली होती. जी आज देखील देशाच्या गुप्तचर यंत्रणेत कळीची भूमिका बजावत आहे. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यलढ्याला जनआंदोलनाचे स्वरूप देत सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवाच्या माध्यमातून सांस्कृतिक राष्ट्रवादाची भावना जनमानसात रुजवली.

या माध्यमातून त्यांनी देशभक्त नागरिक घडवण्याचे ऐतिहासिक कार्य करण्याबरोबरच देश चालवण्याची दिशादेखील दिली. आजच्या युवकांनी लोकमान्यांचे गीतारहस्य अवश्य वाचावे. हा ग्रंथ वाचल्यास चुका होणार नाहीत असा सल्ला अमित शहा यांनी जेन झीपिढीला दिला. लोकमान्यांनी आंदोलनांच्या माध्यमातून जनतेला जोडून ठेवण्याचे काम केले. भगवद्गीतेचे व्यावहारिक जीवनातील महत्त्व टिळकांनी ज्या पद्धतीने स्पष्ट केले, त्यातून प्रत्येक नागरिकाला जीवनाची दिशा मिळू शकते. त्यामुळे तरुणांनी त्याचे वाचन केले पाहिजे, असा सल्ला अमित शहा यांनी दिला. पुरस्कार सोहळ्यात सत्काराला उत्तर देताना अजित डोवाल म्हणाले, युवकांनी लोकमान्य टिळकांचे विचार आणि गीतारहस्यचा अभ्यास करून समर्पण, त्याग आणि कर्तव्यभावनेने विकसित भारताच्या उभारणीत सहभागी व्हावे. स्वातंत्र्य ही सहज मिळालेली देणगी नसून असंख्य स्वातंत्र्यसैनिकांचा त्याग आणि बलिदानातून प्राप्त झालेली अमूल्य संपत्ती आहे. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे हा संदेश आजच्या काळात विकसित भारताच्या राष्ट्रीय संकल्पात रुपांतरित करण्याची गरज आहे. तरुण पिढीला उद्देशून डोवाल म्हणाले, मनमानी म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. आजचा दिवस अत्यंत विशेष आहे. स्वातंत्र्यसंग्रामाचे प्रेरक, अद्भूत सेनानी, विचारवंत आणि मार्गदर्शक लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आहे. युवकांनी लोकमान्यांची राष्ट्रउभारणीची परिकल्पना काय होती, याचा गांभीयाने विचार करण्याची गरज आहे. आजच्या तरुणांना वाटते की, स्वातंत्र्य म्हणजे केवळ स्वतःच्या इच्छेने किंवा मनात येईल ते करणे. पण स्वातंत्र्य म्हणजे एवढेच नाही. ज्या काळी इंग्रजांविरुद्ध आवाज उठवण्याचे धैर्य कोणामध्येही नव्हते, समाजात वेदना आणि अत्याचार होते, त्या काळी लोकमान्य टिळकांनी संघर्षाचा कठीण मार्ग स्वीकारत देशाचे नेतृत्व केले. लोकमान्य टिळक पुरस्कार आतापर्यंत अनेक महनीय व्यक्तींना प्रदान करण्यात आला. यंदा राष्ट्रीय सुरक्षेला नवी दिशा देणाऱ्या, राष्ट्राकरिता जीवन समर्पित केलेल्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना हा पुरस्कार देण्यात आला. एका धुरंधराला पुरस्कार देण्यासाठी दुसरे धुरंधर आज कार्यक्रमाला आलेले आहेत. एक राष्ट्रीय सुरक्षेच्या क्षेत्रातील चाणक्य, तर दुसरे राजकीय क्षेत्रातील चाणक्य असा दुग्धशर्करा योग जुळून आल्याचे उद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमात बोलताना काढले. डोवाल यांनी आपल्या भाषणात देशासमोरील अंतर्गत आणि बा आव्हानांचा उल्लेख केला. त्या संदर्भात युवकांना सावध राहण्याचा सल्ला देताना ते म्हणाले. रणनीती, विकास आणि राष्ट्रीय सुरक्षा याबाबत विचार करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे, ज्या मागार्मुळे देशाचे नुकसान होईल, तो मार्ग कधीही स्वीकारू नका. राष्ट्रहितात जे नाही ते अखेरीस आपल्या हिताचेही नसते. आजही देशासमोर अनेक अंतर्गत आणि बा आव्हाने आहेत. अशावेळी एकजूट ठेवून देशासाठी काम करण्याची गरज आहे. देशाला जगातील सर्वांत शक्तिशाली राष्ट्र बनवण्याची क्षमता आपल्या युवकांमध्ये आहे. पंतप्रधान मोदी, अमित शहा यांचा उल्लेख करताना ते म्हणाले, देशाला पुढे नेण्याची त्यांची तळमळ आणि राष्ट्राप्रती असलेले समर्पण मी जवळून पाहिले आहे. देशहितासाठी घेतलेले निर्णय भारताला अधिक सक्षम बनवतील असे मत त्यांनी व्यक्त केले. जंतरमंतरवरील घटनेनंतर गृहमंत्री अमित शहा प्रथमच पुण्यात येत होते. काँग्रेसने त्यांच्या विरोधात निदर्शने करण्याचा इशारा दिला होता.

# शब्दांपलीकडचा अलौकिक मैत्रीचा कलश

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

इतिहासाच्या पानांवर युद्धांचे, पराक्रमाचे, राजकारणाचे आणि रक्ताच्या नात्यांचे हजारो पोवाडे कोरलेले आहेत, पण याच इतिहासाच्या एका कोपऱ्यात रक्ताच्या नात्यालाही लाजवेल अशा एका अलौकिक, अतूट आणि दैवी मैत्रिचे महाकाव्य लिहिले गेले आहे. ते महाकाव्य म्हणजे स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज आणि त्यांचे परममित्र, अमात्य कवी कलश यांचे आहे. आपण रोजच्या जगण्यात मित्र हा शब्द चहाच्या टपरीवर गप्पा मारणारे, सुखाच्या काळात सोबत असणारे किंवा फार फार तर पडत्या काळात मदतीचा हात देणारे अशा मर्यादित अर्थाने खूप सहज वापरतो. पण जेव्हा मृत्यू समोर उभा ठाकलेला असतो आणि शरीराचे लचके तोडले जात असतात, अशाही भीषण परिस्थितीत स्वतःच्या वेदना विसरून, केवळ शत्रूचा जळफळाट करण्यासाठी आणि आपल्या मित्राच्या शौर्याचा गौरव करण्यासाठी काव्य रचणारा कवी कलश यांच्यासारखा मित्र या संपूर्ण ब्रह्मांडात दुर्मिळच ठरतो. ही मैत्री म्हणजे केवळ दोन व्यक्तींचे एकत्र येणे नव्हते, तर ते दोन आत्म्यांचे एकरूप होणे होते, ज्यांनी मृत्यूच्या दारापर्यंतच नव्हे, तर मृत्यूच्या दारापलीकडेही एकमेकांचा हात सोडला नाही.

आपल्या भारतीय संस्कृतीत आणि पुराणात मैत्रीला नेहमीच देवापेक्षाही वरचे स्थान दिले गेले असून, मानवी नातेसंबंधांचे धागे समजून घेण्यासाठी जेव्हा आपण पौराणिक काळाकडे नजर टाकतो, तेव्हा संभाजी महाराज आणि कवी कलश यांच्या नात्याची पाळेमुळे त्या थोर परंपरांशी जोडलेली दिसतात. जिथे राजेशाहीचे वैभव आणि गरिबीची झालर गळून पडते आणि केवळ निखळ प्रेम उरते, अशी द्वारकेचा राजा श्रीकृष्ण आणि अत्यंत दरिद्री सुदामा यांची मैत्री जगाला परिचित आहे; कवी कलश जेव्हा उत्तर भारतातून महाराष्ट्राच्या मातीत आले, तेव्हा ते केवळ एक विद्वान कवी म्हणून आले नाहीत, तर शंभूराजांच्या मनातील एकाकीपणाला आणि त्यांच्यातील वादळाला समजून घेणारा एक हक्काचा सुदामा बनून राहिले. तसेच, पौराणिक साहित्यात निष्ठेचे सर्वात मोठे प्रतीक असणाऱ्या सूर्यपुत्र कर्णाने, दुर्योधन अधर्माच्या बाजूने लढत आहे हे ठाऊक असूनही, केवळ त्याने ऐनवेळी दिलेल्या मैत्रीच्या आदराखातर महाभारताच्या युद्धात आपल्या प्राणांची आहुती दिली आणि 'जग विरोधात गेले तरी मी माझ्या मित्राची साथ सोडणार नाही' हाच कर्णाचा बाणा कवी कलश यांनी मोगला छावणीत हुबेहूब जिवंत केला.

कृष्ण-सुदामा आणि कर्ण-दुर्योधन यांच्या पलीकडेही आपल्या पुराणात आणि प्राचीन साहित्यात मैत्रीची अशी अनेक रूपे आहेत, जी मानवी नात्यांचे वेगवेगळे पैलू उगलडून दाखवतात. रामायणातील श्रीराम आणि वानरराज सुग्रीव यांची मैत्री ही 'परस्पर सहकार्याची' उत्तम व्याख्या आहे; जेव्हा दोघेही अत्यंत कठीण परिस्थितीत होते– श्रीराम सीतामाईच्या शोधात वनात भटकत होते आणि सुग्रीव स्वतःच्या भावाच्या म्हणजे वालीच्या भयाने ऋष्यमूक पर्वतावर लपून राहत होता. तेव्हा अग्नीला साक्षी ठेवून त्यांनी मैत्रीची शपथ घेतली आणि श्रीरामांनी सुग्रीवाला त्याचे राज्य व सन्मान परत मिळवून दिला, तर सुग्रीवाने संपूर्ण वानरसेनेला सोबत घेऊन श्रीरामांच्या सीताशोध मोहिमेत प्राणांची बाजी लावली.

महाभारतातील अर्जुन आणि श्रीकृष्णाची मैत्री ही 'सख्य भक्ती' आणि 'मार्गदर्शनाचे' सर्वोच्च उदाहरण आहे, जिथे कृष्ण हा केवळ अर्जुनाचा नातेवाईक किंवा सारथी नव्हता, तर तो त्याचा असा सखा होता ज्याच्यासमोर अर्जुन आपले मन पूर्णपणे मोकळे करू शकत होता आणि युद्धाच्या मैदानात जेव्हा अर्जुन खचला, तेव्हा याच सख्याने गुरु बनून त्याला 'भगवद्गीता' सांगत दिशा दाखवली.

पौराणिक कथेत मैत्रीचा आणि कौटुंबिक विश्वासाचा एक वेगळाच सुंदर प्रसंग कर्ण, दुर्योधन आणि भानूमती यांच्यात येतो, जेव्हा भानूमती चौपटीच्या खेळात हरत असताना दुर्योधनाला पाहून आदराने उठू लागली आणि पाठी फिरून बसलेल्या कर्णाला ती पळते आहे असे वाटून त्याने तिचा पदर पकडला, ज्यामुळे तिच्या गळ्यातील मोत्यांची माळ तुटून मोती विखुरले, अशा वेळी कोणताही पती संशय घेईल, पण दुर्योधनाने तिथे येऊन कर्णावर व आपल्या पत्नीवर असणाऱ्या अथांग विश्वासापोटी हसत विचारले, 'मोती गोळा करू की फक्त दोरा ओवू?'. याउलट, मैत्री कशी नसावी याचा एक महत्त्वाचा धडा राजा द्रुपद आणि द्रोणाचार्य यांच्या कथेतून मिळतो, जिथे बालपणीचे पक्के मित्र असूनही द्रुपदाने राजाच्या अहंकारातून द्रोणाचार्यांचा 'एक राजा आणि दरिद्री कधीच मित्र असू शकत नाहीत" असे म्हणून अपमान केला, ज्या अपमानातून पुढे महाभारताच्या युद्धाची कारणे जन्मास आली. परंतु शंभूराजे आणि कवी कलश यांनी राजा आणि कवी हा फरक कधीच आपल्या मैत्रीत येऊ दिला नाही. कवी कलश यांनीही शंभूराजांच्या आयुष्यात अनेकदा अशाच खंबीर मार्गदर्शकाची भूमिका निभावली होती.

ऐतिहासिक दाखला द्यायचा झाल्यास धारानगरीचे राजे भोज आणि धारचेच एक शूर राजे जगदेव परमार यांची मैत्री प्रसिद्ध आहे, जिथे राजे भोज यांच्यावर आलेल्या एका मोठ्या संकटाचे निवारण करण्यासाठी जगदेव परमार यांनी स्वतःच्या हाताने स्वतःचे शीर कापून देवीला अर्पण केले होते. मित्रासाठी थेट स्वतःचे शीर कापून देण्याची ही पराकाष्ठा हुबेहूब कवी कलश आणि शंभूराजांच्या बलिदानाशी मिळतीजुळती आहे. थोडक्यात सांगायचे तर, मैत्री कधी सुग्रीवासारखी केवळ सोबतीची असते, कधी कृष्ण-अर्जुन सारखी मार्गदर्शनाची असते, तर कधी कर्ण-दुर्योधन सारखी संपूर्ण विश्वासाची असते, तर कधी द्रुपद-द्रोणाचार्य सारखी अहंकाराने तुटणारी असते, पण जेव्हा या सगळ्या गुणांचा संगम होऊन मैत्री थेट मृत्यूच्या दारात जाऊन उभी राहते, तेव्हा तिथे फक्त 'संभाजी महाराज आणि कवी कलश' हेच नाव अजरामर होते.

१६८९ मधील तो मार्च महिना महाराष्ट्राच्या छाताडावर घाव घालणारा ठरला, कारण तुळापूरच्या छावणीत मोगली क्रूरतेचा नंगानाच सुरू होता आणि छत्रपती संभाजी महाराज व कवी कलश फितुरीचे बळी ठरून औरंगजेबाच्या कैदेत होते. औरंगजेबाचा अहंकार गगनाला भिडला असल्यामुळे त्याने या दोघांचे असह्य, अमानुष हाल करण्याचे आदेश दिले होते, ज्यामध्ये शरीराची कातडी सोलली जात होती, डोळे काढले जात होते आणि रक्ताच्या धारा वहात होत्या. एखादा सामान्य माणूस असता, तर त्याने या प्रसंगी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी औरंगजेबाच्या पाया पडून याचना केली असती, पण तिथे उभे होते मराठ्यांचे छत्रपती आणि त्यांचे सखे कवी कलश. कवी कलश यांना उलट टांगून ठेवण्यात आले होते आणि असह्य वेदना होत असतानाही कलश यांनी बाजूला उभे असलेल्या आपल्या राजाकडे पाहिले. शंभूराजांचे डोळे काढलेले होते, शरीर छिन्नविछिन्न झाले होते, पण त्यांच्या चेहऱ्यावरील तोच तेजस्वी, करारी राजबिंडा बाणा आणि मोगली सत्तेला थुंकणारा स्वाभिमान तसाच जिवंत होता. आपल्या सख्याचा, आपल्या राजाचा हा महामेरू सारखा अवतार पाहून कवी कलश यांनीपेक्षा वेदना क्षणात जळून खाक झाल्या आणि त्यांच्यातील महाकवी आणि सच्चा मित्र एकाच वेळी गर्जला. औरंगजेबाच्या भर दरबारात, जिथे मोगली सरदारांची बोलती बंद होती.

तिथे कवी कलश यांनी औरंगजेबाच्या तोंडावर,

'यावन रावण की सभा, संभू बंध्यो बजरंग,
लह्यो लसानी देखके, त्यो जल गयो अनंग'

असे थेट शब्दांचे बाण चालवले. या एका छंदाने संपूर्ण तुळापूर हादरले, कारण कलश औरंगजेबाला ठणकावून सांगत होते की, 'हे औरंगजेबा, तुझा हा दरबार म्हणजे रावणाची सभा आहे आणि माझे शंभूराजे म्हणजे साक्षात हनुमान आहेत, ज्यांना तू साखळदंडाने बांधले आहेस; पण लक्षात ठेव, हनुमानाने जशी रावणाची लंका जाळली होती, तसाच शंभूराजांचा हा स्वाभिमान आणि हे बलिदान तुझ्या या मोगली साम्राज्याची राख रांगोळी केल्याशिवाय राहणार नाही.' मृत्यूच्या दारात उभ्या असलेल्या एका कैद्याने, स्वतःच्या वेदना विसरून, शत्रूसमोर आपल्या मित्राचे आणि आपल्या राजाचे असे अलौकिक कौतुक करावे हे पाहून औरंगजेबाचे पाणी पाणी झाले; तख्तावर बसूनही औरंगजेब पराभूत झाला होता आणि साखळदंडात अडकूनही संभाजी महाराज आणि कवी कलश जिंकले होते.

जगातील अनेक इतिहासकारांनी आणि काहींनी कवी कलश यांनीवर 'परप्रांतीय', 'तांत्रिक' किंवा 'फितूर' म्हणून चिखलफेक करण्याचा प्रयत्न केला, पण इतिहासाने आणि तुळापूरच्या मातीने हे सिद्ध केले की, खरी मैत्री जात, प्रांत, भाषा किंवा रक्ताच्या नात्याच्या सीमा मानत नाही, ती मानते फक्त एकच भाषा, ती म्हणजे शब्दांपलीकडच्या निष्ठेची.

रामायणात जेव्हा लक्ष्मण मूर्च्छित पडतात, तेव्हा प्रभू रामचंद्र विलाप करताना म्हणतात की, जगात सर्व काही पुन्हा मिळू शकते, पण सखा भाऊ किंवा खरा मित्र पुन्हा मिळणे असणे अशक्य आहे; शंभूराजे आणि कवी कलश यांचे नाते हे अशाच ऋणुबंधांचे अंतिम सत्य होते, जे जसे आयुष्यभर एकत्र जगले, सुख-दुःखात सोबत राहिले, तसेच ते मृत्यूला सायमोरे जातानाही एकत्र गेले. त्यांचे रक्त जेव्हा तुळापूरच्या मातीत एकमेकांत मिसळले, तेव्हा मैत्रीची एक अशी सर्वोच्च व्याख्या तयार झाली, जिच्या समोर जगातील सर्व सत्ता, संपत्ती आणि नाती फिकी पडली.

ही केवळ दोन देहांची आहुती नव्हती, तर ती मृत्यूच्या दारालाही लाथ मारून अजरामर झालेली एक दिव्य प्रेमकथा होती, जी युगायुगांपर्यंत या महाराष्ट्राला आणि संपूर्ण जगाला सांगत राहील की, मैत्री असावी तर छत्रपती संभाजी महाराज आणि कवी कलश यांच्यासारखी, जी केवळ आयुष्याच्या प्रवासातच सोबती नसते, तर मृत्यूच्या महाद्वारातही शत्रूचा थरकाप उडवत एकत्र पाऊल टाकते.

– ९५६१५९४३०६

# झिरो टू हिरो आणि पुन्हा झिरोचा थरार!

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

टी-२० क्रिकेटचा थरार नेहमीच चाहत्यांच्या अंगावर काटा आणणारा असतो. या फॉरमॅटमध्ये सलामीवीरांना पहिल्याच चेंडूपासून आक्रमक खेळण्याचा परवाना दिलेला असतो. परंतु, याच आक्रमकतेच्या नादात कधीकधी अशा काही विचित्र आकडेवारीची नोंद होते, जी चाहत्यांना चक्रावून सोडते. एका सामन्यात शतकी धमाका करणारा फलंदाज दुसऱ्याच सामन्यात शून्यावर तंबूत परतताना दिसतो. टी-२० मधील भारतीय सलामीवीरांचा हाच 'झिरो टू हिरो आणि पुन्हा झिरो'चा प्रवास अत्यंत रंजक आणि तितकाच धक्कादायक आहे. हा प्रवास पाहताना एक गमतीशीर गोष्ट प्रकषार्ने जाणवते–जेव्हा हे खेळाडू फ्लॉप होतात, तेव्हा सलग अपयशी ठरतात; पण जेव्हा फॉर्ममध्ये येतात, तेव्हा थेट शतके ठोकून प्रतिस्पर्ध्यांचे धाबे दणाणतात!

**संजू सॅमसन आणि अभिषेक शर्माचे अजब विक्रम**

या यादीत सर्वात थक्क करणारे नाव म्हणजे संजू सॅमसन. टी-२० क्रिकेटच्या इतिहासात सलग दोन सामन्यांत दोन धडाकेबाज शतके ठोकल्यानंतर, पुढील सलग दोन सामन्यांत शून्यवर बाद होणारा संजू हा जगातील एकमेव फलंदाज ठरला आहे. इतकेच नाही, तर एकाच वर्षात ५ वेळा शून्यावर आऊट होण्याचा एक नकोसा विक्रमही त्याच्या नावावर नोंदवला गेला आहे. संजूच्या कारकिर्दीत '५, ३, १' आणि '५, ०, १' अशा एकेरी धावसंख्येच्या मालिका दोन वेळा आल्या आहेत.

दुसऱ्या बाजूला, कारकिर्दीच्या दुसऱ्याच सामन्यात वादळी शतक ठोकणारा अभिषेक शर्मा देखील या विचित्र आकड्यांच्या फेऱ्यात अडकला. जागतिक स्पर्धेसारख्या मोठ्या मंचावर सलग तीन सामन्यांत शून्यावर (०, ०, ०) आऊट होण्याची दुर्मिळ 'डक हॅटट्रिक' त्याच्या नावावर जमा झाली. याशिवाय '४, ७, ४' आणि अलीकडेच '३, १, ८, २*' असा सलग डावांमध्ये अपयशी ठरण्याचा टप्पाही त्याने अनुभवला आहे.

**दिग्गजही सुटले नाहीत या फेऱ्यातून!**

एकेरी धावसंख्येवर माघारी परतण्याची ही मालिका फक्त नवोदितांपुरती मर्यादित नाही. 'रन मशीन' विराट कोहली देखील '१, ४, ०' असा अपयशी ठरत या दुर्मिळ टप्प्यातून गेला आहे. तर स्वतःच्या अटींवर खेळणारा वीरेंद्र सहवाग पहिल्याच चेंडूवर षटकार मारण्याच्या नादात '९, ५, ०, १' अशा धावसंख्येवर बाद झाला होता.

कसोटीचा फॉर्म टी-२० मध्ये शोधण्याचा अयशस्वी प्रयत्न करताना मुरली विजय (०, २, ७, ५) चाचपडला. तर भारताचा सर्वात क्लासिक फलंदाज के. एल. राहुल याच्या बाबतीत '०, १, ०, ०' असा तीन शून्यांचा धक्कादायक काळ आला, ज्याने चाहत्यांच्या हृदयाचे ठोके चुकवले होते. राहुलच्या बाबतीत '४, ९, ९' अशी ९ च्या आकड्याने दिलेली चकवा-फसवीही पाहायला मिळाली.

नव्या पिढीतील शुभमन गिल क्लासिक शॉट्स मारण्याच्या नादात एज (कड) लागून '३, ७, ६' आणि '९, ०, ८' असा दोनदा एकेरी धावसंख्येच्या दुष्काळात सापडला. तर ईशान किशन पॉवरप्लेचा फायदा उठवण्याच्या घाईत '२, १, ४' वर तंबूत परतला.

**या प्रवासातून मिळणारे तीन महत्त्वाचे निष्कर्ष**

अति-आक्रमकतेचा फटका : - टी-२० मध्ये 'पहिल्या चेंडूपासून फटकेबाजी' करण्याच्या नव्या भारतीय धोरणामुळे (इंटेंट बेस्ड अप्रोच) अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसनसारखे आक्रमक खेळाडू पहिल्याच षटकात मोठा धोका पत्करताना आपली विकेट गमावून बसतात.

टी-२० कोणाचाही मुलाहिजा ठेवत नाहीः - या यादीत विराट कोहली आणि वीरेंद्र सेहवागसारख्या दिग्गजांची उपस्थिती हेच सिद्ध करते की हा फॉरमॅट महान खेळाडूंनाही सोडत नाही.

'डबल ट्रबल'ची भीतीः -शुभमन गिल, के. एल. राहुल, संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा या चौघांच्याही कारकिर्दीत असा एकेरी धावसंख्येचा टप्पा एकदा नव्हे तर दोन-दोन वेळा आला आहे.

**थोडक्यात सांगायचे तर...**

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये "आज राजा, तर उद्या रंक" व्हायला अगदी एका चेंडूचाच वेळ लागतो !

– ९०९६३७२०८२

# सरकारचे ईपीएस-९५ पेंशन धारकांवरील दुर्लक्ष म्हणजे जेष्ठ नागरिकांची खुली थट्टाच!

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

२०१४ पासुन ईपीएस पेंशन धारक फक्त जगण्याइतकी इतकी पेन्शनची मागणी करीत आहे.परंतु सरकार प्रत्येक अधिवेशनात डोळे बंद करून फक्त तमाशा पहात आहे.जेष्ठ नागरिक ईपीएस पेंशन धारक कमीत कमी ७५०० पेंशन व महागाई भत्ता मिळावा यासाठी वृध्दापकाळात सुध्दा संघर्ष करीत आहे.परंतु सरकारच्या नाकावरील माशी सुद्धा उडतांना दिसत नाही हे जेष्ठांच्या प्रती दुर्भाग्य म्हणावे लागेल.सरकार निवडणुकीच्या काळात मतदारांना लॉलीपॉप देवून अनेक मोफत योजना अंमलात आणते. परंतु देशाचा शिल्पकार कामगार वर्ग फक्त जगण्याइतकी पेन्शनची मागणी करते तेव्हा सरकार प्रत्येक अधिवेशनात पाठ फिरवितांना दिसते.

देशात वाढती महागाई,वाढता औषधोपचार, वाढते कर आणि वाढत्या प्रदूषणामुळे वृध्दापकाळातील ढासळते आरोग्य यांनी ईपीएस-९५ पेंशन धारक अत्यंत त्रासलेला असुन ग्रस्त आहे.कारण अल्पशा पेंशनमध्ये पेन्शन धारक कोणतेही काम पूर्ण करूच शकत नाही.यावर सरकारने कानांवर हात ठेवले आहे व तोंडावर बोट ठेवले आहे यावरून स्पष्ट होते की, सरकारला ईपीएस ९५ पेंशन धारकांशी काहीही देणेघेणे नाही.त्यामुळे सरकारला विनंती आहे की,आपण जर या गंभीर समस्येवर तोडगा काढूच शकत नसेल तर स्वेच्छा मरणाची परवानगी दिली पाहिजे.याचे स्वागत आम्ही ईपीएस पेंशन धारक आनंदाने करू. गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.

या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे.यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले.सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री, खासदार, आमदार, प्रशासकीय विभाग यांना निवेदनाच्या माध्यमातून सरकारपर्यत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले.त्यामुळे या पावसाळी अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील करोडो वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही पावसाळी अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब आहे.अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरूच आहे.

लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दुःख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही. ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा, संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे.केंद्र सरकार मोठमोठ्या गोष्टी करत आहेत परंतु वृध्दांकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे. ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल या आशेने आतापर्यंत उम्मीद टीकुन होती.परंतु सरकार मिनिमम पेंशन बद्दल एकही शब्द बोलायला तयार नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत,मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या पावसाळी अधिवेशनात दिसून आले.

आज देशातील करोडो ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.सरकार महागाई वाढवीते तेव्हा कोणाचाही विचार न करता भरमसाठ महागाई वाढविते आणि ईपीएस पेंशन धारक फक्त ७५०० रुपए पेन्शन मागते तेव्हा सरकार पाठ फिरविते ही कुठली लोकशाही म्हणावी.आज सरकारने महागाईचा मोठा डोंगर उभा केला आहे यात सर्वसामान्य व पेंशन धारक दबलेला आहे.यामुळे अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल, घरटॅक्स, वाढती महागाई, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा १००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य सरकारला का दिसत नाही? सरकार एवढी निर्लज्ज का झाली?

पेंशन धारकांची मागणी होती की, कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा मिळावी. परंतु वित्त मंत्री निर्मला सिताराम यांनी संपूर्ण ईपीएस-९५ पेंशन धारकांना निराश केल्याचे स्पष्ट दिसून येते आहे.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर, महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने या पावसाळी अधिवेशनात घेणे गरजेचे होते. परंतु सरकारने याला यत्किंचितही महत्व दिले नाही ही अत्यंत दुःखद बाब आहे. वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले.केंद्र सरकारने आतापर्यंत करोडो ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले होते. कारण पेन्शन ही त्यांच्या "म्हारपणाची शीदोरी" आहे. त्यामुळे पेन्शन हे "जीवन-मरणाचे" साधन सुध्दा आहे.

– ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)–४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ – मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेची प्राथमिक फेरी उद्यापासून

## ४२७ भजनी मंडळ करणार तुकडोजी महाराजांच्या भजनांचा जागर, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती द्वारे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भजनांवर आधारित विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला ५ ऑगस्ट रोजी प्रारंभ होत आहे.



या स्पर्धेचे उद्घाटन नागपूरच्या महापौर नीताताई ठाकरे यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार भारती विदर्भच्या अध्यक्ष सौ कांचनताई गडकरी राहतील. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरीचे सर्वाधिकारी प्रकाश महाराज वाघ, भाजप शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिलजी सोले, अखिल भारतीय गुरुदेव मंडळ नागपूरचे श्री अशोक यावले, राजेश कुंभलकर, तुकडोजी महाराजांच्या विचारांचे प्रचारक साहित्यिक ज्ञानेश्वरजी रक्षक, जयप्रकाशजी गुप्ता, हेमंतजी काळमेघ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा विजयालक्ष्मी थोटे आदी मान्यवर उपस्थित राहतील.

७ ऑगस्ट पर्यंत श्री संताजी सभागृह, सोमवारी क्वार्टर, सक्करदरा (नागपूर) येथे चालणाऱ्या या स्पर्धेत विदर्भातील १५५, नागपूर जिल्ह्यातील ९० आणि नागपूर शहरातील १८२ असे एकुण ४२७ भजनी मंडळ राष्ट्रसंतांच्या भजनाचा जागर करणार आहे. या खंजरी भजन स्पर्धेत सहभागी मंडळांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रचित पारंपरिक चालींवर आधारित तसेच प्रबोधनात्मक व राष्ट्रसेवेला समर्पित अश्या दोन विषयांवरील एकूण २ भजने ८ मिनिटांच्या आत सादर करायची आहेत. भजन करताना वाद्यवृंदामध्ये तबला, हार्मोनिअम, टाळ यासोबत खंजरी असणे अनिवार्य आहे.

या कार्यक्रमासाठी खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती अध्यक्ष प्रा. अनिल सोले, जयप्रकाश गुप्ता, अविनाश घुशे, प्रा. राजेश बागडी, अशोक मानकर, डॉ. गौरीशंकर पाराशर, देवेंद्र यादव, शशांक खेकरे, दीपक खिरवडकर, बाळासाहेब कुळकर्णी, चेतन कायरकर, दिलीप जाधव, संदीप गवई, रेणुका देशकर, भोलानाथ सहारे, विलास त्रिवेदी, एड. नितीन तेलगोटे, किशोर पाटील, मनिषा काशिकर, विजय फडणवीस, रामभाऊ आंबुलकर, किसन गावंडे, दिलीप गौर, महेंद्र राऊत, गिरधारी निमजे, शैलेश ढोबळे, राजू कनाटे, योगेश बन, डॉ. श्रीरंग वराडपांडे आणि समितीचे पदाधिकारी परिश्रम घेत असून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या खंजरी भजन स्पर्धेला उपस्थित राहून भजनी मंडळांचा उत्साह वाढवावा असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीने केले आहे.

### भरघोस बक्षिसे

खंजरी भजन स्पर्धेतील प्रथम विजेत्या संघाला ५१ हजार रुपये रोख, द्वितीय क्रमांकाला ३१ हजार रुपये, तृतिय क्रमांकाला २५ हजार रुपये, चतुर्थ २१ हजार, पाचवे स्थान प्राप्त करणाऱ्यांना १५ हजार, सहाव्या स्थानाला ११ हजार तर सातव्या क्रमांकावरील संघाला ७ हजार रुपये रोख पुरस्कार प्रदान करण्यात येईल. याशिवाय दहा उत्तेजनार्थ पुरस्कार (प्रत्येकी ५ हजार) देखील प्रदान करण्यात येणार आहेत.

### महाअंतिम फेरी ९ ऑगस्ट रोजी

या स्पर्धेची महाअंतिम फेरी रविवार दि. ९ ऑगस्ट रोजी दुपारी १ ते सायंकाळी ५ या वेळेत रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात होईल. त्यानंतर बक्षीस वितरण सोहळा केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

---

थोडक्यात

## डॉ. सुधीर अग्रवाल महाराष्ट्र लोकनायक पुरस्काराने सन्मानित



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त दैनिक लोक युवा या वृत्तपत्राच्या वर्धापनदिनाच्या औचित्य साधून संत गजानन महाराज यांच्या पदस्पशार्ने पावन झालेल्या नगरीत प्रा. डॉ. सुधीर नरसिंगदास अग्रवाल यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र लोकनायक पुरस्काराने शाल, श्रीफळ, प्रशस्ती पत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल हे मागील वीस वर्षांपासून वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकजागृती, समाज प्रबोधन आणि अन्याय निवारणाचे कार्य करत आहे.

पुरस्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ हे होते. कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून विजय कुळकर्णी ज्येष्ट पत्रकार तथा जिल्हा प्रतिनिधी तरुण भारत, चंद्रकांत घोराडे शहर अध्यक्ष भाजप, बाळासाहेब दामोदर उद्द्योजक, हे होते. पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरातील श्री स्वामी रामदास क्रीडा मंदिर परिसरातील स्वाध्याय कक्षात दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आला. दैनिक लोक युवा या वृत्तपत्राच्या वर्धापनदिनाच्या औचित्य साधून दरवर्षी महाराष्ट्र लोकनायक पुरस्काराचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमात सामाजिक, शैक्षणिक, विधी, पत्रकारिता, आरोग्य, वैद्यकीय, प्रशासकीय सेवा, उद्योग, बालकल्याण अशा विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचा सत्कार देखील करण्यात आला.

## माऊली योग ग्रुपतर्फे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
माऊली योग ग्रुपतर्फे तसेच ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या सौजन्याने गुरुपौर्णिमेनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करून गुरूंच्या कायार्ला अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात इंदिरा मोजनकर व वषार्ताई यांनी सादर केलेल्या स्वागतगीताने झाली. अखिल भारतीय संस्थेच्या महाराष्ट्र सचिव कविता रेवतकर यांनी आपल्या मार्गदर्शनात गुरुपौर्णिमेचे महत्त्व विशद करतांना, प्रत्येक व्यक्ती आपल्या आयुष्यात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात गुरु असते, हा प्रेरणादायी संदेश दिला. बोंडे भाऊ यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगून ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस व सत्कार केला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी ज्योती द्विवेदी यांनी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी गुरुंचे मार्गदर्शन किती आवश्यक आहे, यावर भाष्य केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बोंडे होते.

यावेळी प्रकाश खोब्रागडे, योगगुरू शिला भुते, उषा शिंदे, माधुरी बालपांडे, मते मॅडम, डॉ. बोरकर आणि शंकर जांभुळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. योगामुळे शरीर निरोगी राहते व निरोगी जीवनासाठी नियमित योगाभ्यासाचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन कुंदा गोडबोले यांनी तर माधुरी बोंडे यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

## डॉक्टर पुष्पा सुभाष तायडे राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
ग्लोबल एलिट मीडिया अँड टेक्नॉलॉजी या संस्थेच्या वतीने दिनांक दोन ऑगस्ट २०२६ रोजी नॅशनल आयडियल टीचर अवार्ड २०२६ कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे आमदार विकास ठाकरे पश्चिम नागपूर विधानसभा, ग्रुप कॅप्टन



विजय हरदास रिटायर्ड इंडियन एअर फोर्स कारगिल युद्धात भाग घेतलेले कॅप्टन , फ्लाईट लेफ्टनंट करुणा हरदास फर्स्ट वूमन अकाउंट ऑफिसर इंडियन एअर फोर्स. महेश मानकर ,मानकर ग्रुप चे एक्झिक्युटिव्ह ऑफिसर, जफार अहमद खान प्रेसिडेंट स्कूल हेडमास्टर्स चॅरिटेबल असोसिएशन नागपूर हे उपस्थित होते. या कार्यक्रमात डॉ. पुष्पा सुभाष तायडे यांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल महेश मानकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले डॉ. पुष्पा सुभाष तायडे ह्या लोक महाविद्यालय वर्धा च्या माजी प्राचार्य असून दत्ता मेघे मेडिकल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट येथे लिबरल आर्ट आणि ह्युमॅनिटीज डिपार्टमेंटच्या डीन म्हणून कार्य करीत आहे.

त्यांनी एकूण ३४ वर्षे शैक्षणिक क्षेत्रात काम केले असून सतरा वर्षे प्राध्यापक व १७ वर्षे प्राचार्य म्हणून काम करण्याचा त्यांचा अनुभव आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नऊ विद्यार्थ्यांना पीएच.डी प्राप्त झालेली असून ११ विद्यार्थी एम फिल व १३ विद्यार्थी एमबीए झालेले आहेत. त्यांची १४ पुस्तके प्रकाशित झालेली असून १६ पुस्तकाचे संपादन त्यांनी केलेले आहे. त्यांचे चाळीस रिसर्च पेपर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झालेले असून त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. ग्लोबल एलिट मीडिया अँड टेक्नॉलॉजी या संस्थेच्या वतीने त्यांना आयडियल टीचर अवार्ड ने सन्मानित करण्यात आले. या राष्ट्रीय पुरस्काराबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

---

## पावसाळ्यात सर्दी, ताप व खोकल्याचे रुग्ण वाढले, नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यावी!

### मेंढला प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज ७० ते १०० हून अधिक रुग्णांची ओपीडी



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यात पावसाळा सुरू झाल्यानंतर सर्दी, ताप, खोकला तसेच विषाणूजन्य संसर्गाच्या रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याचे चित्र आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि कमी प्रतिकारशक्ती असलेल्या व्यक्तींमध्ये या आजारांचे प्रमाण अधिक आढळून येत आहे. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन मेंढला प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रणाली हेडाऊ यांनी केले आहे.

मेंढला प्राथमिक आरोग्य केंद्रात सध्या दररोज ७० ते १०० हून अधिक रुग्णांची ओपीडी होत असून, त्यामध्ये सर्दी, ताप, खोकला, घसा दुखणे आणि पोटाच्या संसगार्चे रुग्ण मोठ्या प्रमाणावर येत असल्याचे त्यांनी सांगितले. बदलत्या हवामानामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत असल्याने वेळीच उपचार घेणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. हेडाऊ यांनी सांगितले की, लहान बाळे आणि शालेय विद्यार्थ्यांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. पावसात भिजल्यानंतर ओले कपडे त्वरित बदलणे, उकळून किंवा शुद्ध पाणी पिणे, ताजे व स्वच्छ अन्न सेवन करणे, हात स्वच्छ धुण्याची सवय लावणे आणि ताप, खोकला किंवा श्वास घेण्यास त्रास जाणवल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी.

आरोग्य विभागाकडून पावसाळ्यातील साथीच्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवण्यात आला असून, डॉक्टर व आरोग्य कर्मचारी नागरिकांना योग्य उपचार आणि मार्गदर्शन देत आहेत. गावपातळीवर आशा सेविका व आरोग्य कर्मचारी जनजागृती करत असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता वैद्यकीय सल्ल्यानेच औषधोपचार करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारख्या डासांमुळे पसरणाऱ्या आजारांपासून बचाव करण्यासाठी घराच्या परिसरात पाणी साचू न देणे, पूर्ण अंग झाकणारे कपडे परिधान करणे आणि स्वच्छतेला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचेही डॉ. हेडाऊ यांनी सांगितले.

"आजाराची लक्षणे दिसताच घरगुती उपायांवर वेळ न घालवता त्वरित आरोग्य केंद्रात तपासणी करून योग्य उपचार घ्यावेत. वेळेवर उपचार केल्यास गंभीर गुंतागुंत टाळता येते," असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रणाली हेडाऊ यांनी केले.

## साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त नागपूर येथे अभिवादन व पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी त्यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि परिवर्तनवादी कार्याचा गौरव



करण्यात आला. या कार्यक्रमास नागपूर शहराच्या महापौर निताताई ठाकरे, स्थायी समिती अध्यक्षा शिवानीताई दाणी, भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष महेंद्र प्रधान, लहुजी शक्ती सेनेचे शहराध्यक्ष रमेश पाडण, विदर्भ संघटक बंटीभाऊ इंगळे, विदर्भ उपाध्यक्ष सागरदादा जाधव, लहुजी शक्ती सेना नागपूरचे कार्यकारी अध्यक्ष अंकुश बावणे, वाडी अध्यक्ष कृष्णा खोडके, युवा अध्यक्ष रोशन ठोसर, संजयजी डोंगरे, अंकित चन्ने, सविताताई पाडण तसेच लहुजी शक्ती सेनेचे पदाधिकारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपत सामाजिक समता, बंधुता आणि न्यायाच्या मूल्यांचा प्रसार करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# कायमस्वरूपी पोलीस निरीक्षक नियुक्त करा : भिवापूर भाजपची मागणी

### मुख्यमंत्री, विशेष पोलीस महानिरीक्षक व पोलीस अधीक्षकांकडे मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
भिवापूर पोलीस ठाण्यात गेल्या तीन वर्षांपासून कायमस्वरूपी पोलीस निरीक्षक (पीआय) नियुक्त नसल्याने तालुक्यातील कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम होत असल्याचा आरोप करीत भाजपतर्फे तातडीने अनुभवी पोलीस निरीक्षकाची नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, विशेष पोलीस महानिरीक्षक (नागपूर विभाग) तसेच नागपूर (ग्रामीण) पोलीस अधीक्षक यांना निवेदन पाठविण्यात आले.



निवेदनात भिवापूर हा भंडारा, चंद्रपूर आणि वर्धा या तीन जिल्ह्यांच्या सीमेवरील संवेदनशील तालुका असल्याचे नमूद करण्यात आले आहे. शासनमान्य पीआयचे पद मंजूर असतानाही गेल्या तीन वर्षांपासून सहाय्यक पोलीस निरीक्षकांकडेच ठाण्याचा कार्यभार सोपविण्यात येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासकीय निर्णयक्षमता, पोलीस दलावरील नियंत्रण आणि लोकप्रतिनिधींशी समन्वयावर परिणाम होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

मागील वर्षभरात तालुक्यात संघटित गुन्हेगारीत वाढ झाल्याचा दावा करत काही आरोपींवर मोक्का, एमपीडीए आणि तडीपारीसारख्या कारवाया करण्यात आल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. घरफोड्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, काही ठिकाणी सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असूनही आरोपींचा शोध लागलेला नसल्याचाही आरोप करण्यात आला आहे. तसेच अवैध रेती वाहतूक, गोवंश तस्करी आणि इतर बेकायदेशीर धंद्यांवर प्रभावी नियंत्रण नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

पोलीस ठाण्यात कायमस्वरूपी पीआयची नियुक्ती, घरफोडीच्या गुन्ह्यांच्या तपासासाठी विशेष पथकाची स्थापना, अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाई, पोलीस ठाण्याचा कारभार अधिक शिस्तबद्ध करणे आणि पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

नगरपंचायतीच्या अध्यक्षा सुषमा श्रीरामे, भाजप शहराध्यक्ष अनिल समर्थ आणि भाजप युवा मोचार्चे तालुकाध्यक्ष त्र्यंबक उमक यांनी स्वतंत्र निवेदने सादर केली. यावेळी भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते.

# मैत्रीदिनानिमित्त मातोश्री वृद्धाश्रमात रंगले आषाढ कविसंमेलन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
'अक्षरक्रांती फाऊंडेशन' व 'कला गौरव संस्था' नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आदासा येथील मातोश्री वृद्धाश्रमात मैत्रीदिनाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकीतून वृद्धांचेसुद्धा मनोरंजन व्हावे, त्यांच्या दुःखावर मायेची फुंकर घालावी; या दृष्टीने सदर आषाढ कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.




सकाळच्या पहिल्या सत्रात कला गौरव संस्थेद्वारे अध्यक्ष डॉ. संगीता बनाईत आणि चमूद्वारा प्रस्तुत 'संगीतवारी' या बहारदार कार्यक्रमात मराठी भावगीत, भक्तीगीत, अभंग, बहिणाबाई चौधरी यांच्या स्वरबद्ध कविता तसेच अजरामर मराठी गीतांची मैफल आयोजित केली होती.

कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी बाबा निमजे, सावनेर व वऱ्हाडी कवी दिवाकर देशमुख, अमरावती तथा वृद्धाश्रमातील लाभार्थी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन झाले. संगीतवारी कार्यक्रमात तेथील वृद्धाना मैत्रीदिनानिमित्त फुले देऊन स्वागत करीत त्यांनासुद्धा आपले दुःख विसरून फेर धरून मनसोक्त नाचविले. त्यानंतर 'वऱ्हाडी मायबोली' हा विनोदी वऱ्हाडी कविता व किस्से यांचा लोटपोट हसविणारा बहारदार कार्यक्रम सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी दिवाकर देशमुख यांनी सादर केला.

अस्सल अशा चुलीवरच्या मराठमोळ्या गावरानी जेवणानंतर दुपारच्या दुसऱ्या सत्रात राजुरा येथील सुप्रसिद्ध कवी, गजलकार डॉ. किशोर कवठे यांच्या अध्यक्षतेखाली 'आषाढ कविसंमेलना'चे आयोजन केले होते. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून दैनिक राष्ट्रप्रकाश व देशोन्नति समूहाचे कार्यकारी संपादक तथा राष्ट्रीय कवी सुदर्शन चक्रधर, नागपूर तथा स्वागताध्यक्ष म्हणून मातोश्री वृद्धाश्रम आदासा येथील व्यवस्थापक प्रदीप चंदनबटवे होते. संमेलनाध्यक्ष डॉ. कवठे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की, 'आज समाजाला केवळ लिहिणारे साहित्यिक नव्हे तर आपल्या विचारांना कृतीची जोड देणारे कृतिशील साहित्यिक आवश्यक आहेत. ही जाणीव अशा कवीसंमेलनाच्या माध्यमातून अधिक दृढ होत असल्याचे आशादायी चित्र दिसून येते.' उपस्थित कवी कवयित्री यांच्या एकापेक्षा एक दर्जेदार अशा पाऊस, पाणी, शेती-माती, प्रेम तथा सामाजिक रचनांचे सादरीकरण झाले तर या बहारदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बल्लारपूर येथील प्रसिद्ध गजलकार सुनील बावणे तथा नागपूरच्या सुप्रसिद्ध गजलकार चित्रा कहाते यांनी केले. आभार प्रदर्शन कवयित्री स्वाती सेलोकर यांनी केले.

याप्रसंगी बालभारतीच्या अभ्यासक्रमात साहित्याचा समावेश झाल्याबद्दल डॉ. मंदा नांदुरकर, अमरावती तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात साहित्याच्या समावेशाबद्दल प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त', नागपूर तसेच प्रा. मीनल येवले यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. तसेच बालसाहित्य कवितासंग्रह 'जंगल सफारी'च्या कवयित्री अँड. नीता कचवे, अमरावती तसेच 'मन जेव्हा हिरवळले'च्या कवयित्री मंजुषा कऊटकर यांच्याही पुस्तक प्रकाशनाबद्दल सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन अक्षरक्रांती फाऊंडेशनचे अध्यक्ष शंकर घोरसे तथा कला गौरव संस्थेच्या अध्यक्ष डॉ. संगीता बनाईत यांनी केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लीलाधर दवंडे, भागवत बनाईत, देवेंद्र काटे, श्रीराम डोंगरे, मिताली आनंद, श्रेयस राजूरकर, प्रणाली दहाट, प्राजक्ता वऱ्होकर, कीर्ती लंगडे, वंदना घोरसेसह मातोश्री वृद्धाश्रमातील कर्मचारीवृंद यांनीसुद्धा अथक परिश्रम घेतले. पावसाने दडी मारली असली तरी वाफाळलेल्या गरमागरम चहा व कांदाभज्यांनी आषाढ कवी संमेलनाचा समारोप झाला.

थोडक्यात

## बालपांडे फार्मसी कॉलेज येथील एडवॉन्स अँनेलीटिकल इक्विपमेंट हॅन्डलींग सर्टिफिकेट कोर्सला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दादासाहेब बालपांडे कॉलेज ऑफ फार्मसी, बेसा, नागपूर या महाविद्यालयात दि. २७ जुलै ते १ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अंतर्गत एँडवॉन्स अँनेलीटिकल इक्विपमेंट हँन्डलींग सर्टिफिकेट कोर्स या अल्पकालीन अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर अभ्यासक्रमाचे आयोजन हे औषधीनिर्माणशास्त्र क्षेत्रातील (बी.फार्मसी, एम. फार्मसी व पी.एचडी) विद्यार्थ्यांकरिता करण्यात आले होते. या अल्पकालीन अभ्यासक्रमात औषधीनिर्माणशास्त्र क्षेत्रातील एकूण ४५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. या अभ्यासक्रमात सकाळी सैद्धांतिक सत्रांमध्ये (HPLC, UV-Visible Spectroscopy, FTIR, Gas Chromatography, Molecular Docking, Good Laboratory Practices, QbD) अश्या अत्याधुनिक साधन व यंत्र उपकरणाचे विश्लेषणात्मक व तंत्रज्ञानावरील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन औषधीनिर्माणशास्त्र क्षेत्रातील प्राध्यापक डॉ. प्रशांत पुराणिक, डॉ. अमोल वरोकर, डॉ. सुचित्रा मिश्रा, डॉ. रुची शिवहरे, डॉ. विजयश्री रोकडे, डॉ. देवेश्री नांदुरकर, डॉ. जिग्नेश दोषी, डॉ. संध्या बागडे यांच्या द्वारे करण्यात आले. तसेच या अल्पकालीन अभ्यासक्रमाच्या दुपारच्या प्रात्यक्षिक सत्रांमध्ये (HPLC, FTIR, Gas Chromatography, UV-Visible Spectrophotometer, Spectrofluorophotometer, Particle Size Analyzer, Extruder-Spheronizer, Microwave Assisted Synthesis) आदी अत्याधुनिक साधन व यंत्र उपकरणांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.

सर्व विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आधुनिक विश्लेषणात्मक कौशल्ये आत्मसात केली. या अभ्यासक्रमातील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व दादासाहेब बालपांडे कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने सदर अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या अल्पकालीन अभ्यासक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व अभ्यासक्रम समन्वयक डॉ. अमोल वरोकर आणि डॉ. संध्या बागडे यांनी मेहनत घेतली व महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. उज्वला महाजन यांनी सर्व सहभागीं विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## 'इनर व्हील डिस्ट्रिक्ट ३०३'च्या अध्यक्षपदी मनीषा चौधरी




**दै. सिंहवाणी वृत्त, नाशिक**

इनर व्हील डिस्ट्रिक्ट ३०३च्या वर्ष २०२६ -२७ च्या नव्या नेतृत्वाचा शुभारंभ नाशिक येथे झालेल्या ३६ व्या डिस्ट्रिक्ट असेंब्ली आयाकामध्ये उत्साहात झाला. यावेळी मनीषा चौधरी यांनी डिस्ट्रिक्ट चेअरमन म्हणून पदभार स्वीकारला. समारंभाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. बीना व्यास, तर विशेष अतिथी डॉ. रश्मी शर्मा होत्या. निवृत्त डिस्ट्रिक्ट चेअरमन रमा गर्ग यांनी आपल्या कार्यकाळाचा आढावा घेत पदभार मनीषा चौधरी यांच्याकडे सुपूर्द केला. यानंतर मनीषा चौधरी यांनी नव्या जिल्हा कार्यकारिणीची घोषणा केली. यामध्ये डिस्ट्रिक्ट व्हाइस चेअरमन विद्या रघुशे, आयपीडीसी व असोसिएशन कौन्सिल सदस्य रमा गर्ग, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी मोनिका झुनझुनवाला, डिस्ट्रिक्ट ट्रेझरर योगिता बंग, डिस्ट्रिक्ट आयएसओ स्वाती वानकर, डिस्ट्रिक्ट एडिटर डॉ. उज्वला मोहता, डिस्ट्रिक्ट ईएसओ पीडीसी जुलेखा शुक्ला तसेच डिस्ट्रिक्ट सीसीसीसी पीडीसी कीर्ती चांदे यांचा समावेश आहे.

स्वीकृतीपर भाषणात मनीषा चौधरी यांनी आंतरराष्ट्रीय इनर व्हील अध्यक्षा इंगलॉग विन्थेम्न यांच्या "Grow and Flourish" या वर्षाच्या संकल्पनेनुसार सेवा, मैत्री आणि नेतृत्व अधिक सक्षम करण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी डिस्ट्रिक्ट डायरेक्टरी तसेच डिस्ट्रिक्ट वृत्तपत्र मालती यांचे प्रकाशन डॉ.बीना व्यास व डॉ.रश्मी शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या क्लीन कुंभ या जिल्हास्तरीय प्रकल्पांतर्गत डिस्ट्रिक्ट ३०३ मधील ३० इनर व्हील क्लबांनी एकत्रितपणे ८० मोठ्या कचरा पेट्यांचे दान केले. ऑक्टोबर २०२६ पासून नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्यात स्वच्छता व कचरा व्यवस्थापनासाठी या कचरा पेट्या नाशिक महानगरपालिकेकडे सुपूर्द करण्यात आल्या. समारंभास जिल्ह्यातील विविध क्लबांतील सुमारे २५० सदस्य तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## नवनिर्वाचित विद्यार्थी परिषदेचा 'पदग्रहण सोहळा २०२६-२७' उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मॉडर्न स्कूल, कोराडी रोड, नागपूर येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी इयत्ता ५ वी ते १२ वी च्या नवनिर्वाचित विद्यार्थी परिषदेचा 'पदग्रहण सोहळा' अत्यंत दिमाखात व उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला शाळेचे संचालक अमित येनुरकर, गौरव जयपुरिया, मुख्याध्यापिका रुपाली डे, उपमुख्याध्यापिका अनिता नायर आणि पर्यवेक्षिका सोनाली अय्यर यांची उपस्थिती होती. संचालकांच्या हस्ते विद्यार्थी नेत्यांना शेल्यांच्या माध्यमातून जबाबदारी सोपवण्यात आली. त्यानंतर शपथविधी सोहळा पार पडला. अमित येणूरकर यांनी तरुण नेत्यांना दूरदृष्टी, नम्रता आणि समर्पणाने नेतृत्व करण्याचे तसेच आपल्या सहकाऱ्यांसाठी एक आदर्श उदाहरण बनण्याचे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन दीप्ती काळे, रवी सातफाळे आणि रैना मेश्राम यांनी केले. सूत्रसंचालन सलिहा हसन, व्ही. धनविजया आणि कांचन गुरू चरणदास यांनी केले.

# गडकरी विरुद्ध युवक काँग्रेस

### ई-२० इथेनॉल धोरणाच्या विरोधात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे नागपुरात आंदोलन, नितीन गडकरींच्या घराकडे मोर्चा, शेकडो कार्यकर्ते ताब्यात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केंद्र सरकारच्या ई-२० इथेनॉल धोरणाविरोधात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या वतीने आज नागपूर येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या विरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली. देवडिया काँग्रेस भवन येथून महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे व प्रदेश उपाध्यक्ष कपिल ढोके यांच्या नेतृत्वाखाली शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नितीन गडकरी यांच्या महाल येथील निवासस्थानावर धडक मोर्चा काढला.

मोर्चादरम्यान कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारच्या जनविरोधी इथेनॉल धोरणाचा निषेध करत जोरदार घोषणाबाजी केली. वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर ई-२० इथेनॉल धोरणामुळे सर्वसामान्य नागरिकांवर, वाहनधारकांवर आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असल्याचा आरोप युवक काँग्रेसने केला.



मोर्चा चिटणीस पार्क चौकात पोहोचताच पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात करून कार्यकर्त्यांना अडविले. त्यानंतर पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले. यावेळी अनेक कार्यकर्त्यांना जबरदस्तीने पोलिस वाहनांमध्ये बसवून गणेशपेठ पोलीस ठाण्यात नेण्यात आले. शेकडो युवक काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या नेतृत्वाने केंद्र सरकारवर तीव्र टीका करत सांगितले की, ई-२० इथेनॉल धोरण हे सर्वसामान्य जनतेच्या हिताचे नसून वाहनधारकांना आर्थिक अडचणीत ढकलणारे धोरण आहे. नागरिकांच्या हिताला धक्का देणाऱ्या या धोरणासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा. जनविरोधी निर्णय मागे घेतल्याशिवाय महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचा संघर्ष अधिक तीव्र करण्यात येईल.

आंदोलनात युवक काँग्रेसचे राज्य, विभाग, जिल्हा व शहर स्तरावरील पदाधिकारी, विविध विधानसभा अध्यक्ष, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने युवक सहभागी झाले.



आंदोलनात उपस्थित प्रदेश उपाध्यक्ष अनुराग भोयर, महासचिव रितेश पांडव, अभिषेक धवड, अक्षय हेटे, सुशांत लोखंडे, सागर चव्हाण, रौनक चौधरी, अनुष्का वानखेडे, आकाश गुजर, कौस्तुभ शिर्के,मेहुल आडवाणी, अभिजित ठाकरे, आयुषी देशमुख, रोमा चौधरी, रुबी पठाण,सुमंत कुऱ्हेकर, धीरज धकाते, विजया सावरकर, अक्षय डोर्लीकर, फझलूर कुरेशी, श्रीकांत ढोणे, अफजल बेरा अजहर शेख, नयन तरवटकर, शंतनू धोटे, राजेश अड्डूर, रमीज शेख नितेश राठोड,राहुल सुरकार, शिवराज शिंदे, अंकित हिवराळे, अमित दादगल, शुभम नागपुरे, संदीप रहांगडाले, मिथिलेश कन्हेरे, सलामत अली, रजा अली, सोबत शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी राजेश रंगारी यांची नियुक्ती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभाग (महाराष्ट्र प्रदेश) सचिवपदी नागपूरचे सामाजिक व राजकीय कार्यकर्ते राजेश रंगारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे नागपूरसह संपूर्ण विदर्भातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतर राजेश रंगारी यांनी पक्ष संघटना अधिक बळकट



करण्यासाठी, अनुसूचित जाती समाजाच्या हक्कांसाठी, सामाजिक समता आणि संविधानिक मूल्यांच्या संरक्षणासाठी पूर्ण प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच पक्ष नेतृत्वाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, राजेंद्र पाल गौतम, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, प्रदेश उपाध्यक्ष किशोर कन्हेरे, राष्ट्रीय प्रवक्ते अतुल लोंढे, अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष अनिरुद्ध वानकर, रामटेकचे खासदार श्यामजी बर्वे, माजी मंत्री सुनील केदार, माजीमंत्री व आमदार डॉ. नितीन राऊत, आमदार संजय मेश्राम, आमदार विकास ठाकरे, नागपूर शहर काँग्रेस अध्यक्ष प्रफुल्ल गुढधे पाटील यांच्यासह सर्व वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले. राजेश रंगारी यांच्या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, राजकीय व स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी तसेच काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते श्याम चौधरी, अजय महादुरे, संतोष सिंग, रिझवान अन्सारी, विजय नाडेकर, गिरीधर मुरोडिया, राहुल पळाडे, ऋषी कारंडे, ईश्वर बर्डे, किशोर गायधने, सुरेश गेडाम, गजानन चकोले, नरेंद्र मारघडे, उमेश डेकाटे, भीमराव सहारे, महेंद्र जीवने, राजू वनकर, लिलाधर खैरकर, अनिकेत रंगारी, प्रीतम रामटेके, बाळा रघोर्ते, अब्दुल कादीर, मनोज मेश्राम, विजय शेंडे, पुरोहित कांबळे, सुरेश गजभिये, निवृत्ती मेश्राम, राजीव अंबादे, विजय चालपे, दीपक थोरात, अनिल निंभोरकर आदींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कायासाठी शुभेच्छा दिल्या.

## सन्मित्र सभेच्या नुतन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ संपन्न




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

डॉ. हेडगेवार रकतपेढीच्या सभागृहात नुकताच संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून बोलतांना रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर म्हणाल्या की सन्मित्र सभेचे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील गेल्या ५५ वर्षातील कार्य खरोखरच स्पृहणीय आहे. त्यांनी नागपूर विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण उपक्रमात सन्मित्र सभेच्या भविष्यातील सहकार्याची शक्यता याप्रसंगी व्यक्त केली. डॉ. मनाली क्षीरसागर यांचा सन्मित्र सभेतर्फे याप्रसंगी शाल आणि श्रीफळ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला.

सन्मित्र सभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष अनिल शेंडे यांनी आपल्या प्रस्तविकात सन्मित्र सभेच्या ५५ वषार्तील दैदीप्यमान वाटचाल आणि अनेकविध उपलब्धिंवर ओज्वस्वी शब्दात प्रकाश टाकला आणि भविष्यातील योजना आणि उपक्रम यांचे सुतोवाच याप्रसंगी केले. नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या सदस्यांचे त्यांनी स्वागत केले. कार्यकारिणीत उपाध्यक्ष विनोद जोशी, सचिव-डॉ.सौ. वृषाली शिलेदार, कोषाध्यक्ष -विनोद देशमुख, सहसचिव - प्रवीण मुळे, सहसचिव -गजानन देशपांडे, आणि कार्यकारिणी सदस्य म्हणून, अशोक पत्की, सौ. माधवी भूत, सचिन नारळे, महेश वाबगावकर, शिव शाहू, अरुण केदार, जयदेव धांडे, आणि सहभागी सदस्य उज्वला अंधारे यांचा समावेश आहे. यानंतर सन्मित्र सभेचे नवे सदस्य डॉ. स्मिता आणि सुधीर होटे, विजय लिमये आणि अजय कस्तुरे यांचे स्वागत राजन भूत यांच्या हस्ते करण्यात आले. मावळते अध्यक्ष राजन भूत यांनी नवे अध्यक्ष आणि नव्या कार्यकारिणीला आपल्या शुभेच्छा दिल्या आणि सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन याप्रसंगी दिले.

कार्यक्रमाची सुरवात विवेक पळशीकर यांनी म्हटलेल्या सन्मित्र प्रार्थनेने झाली. यानंतर त्यांनीच लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वरचित टिळक - स्तवन सादर केले. संपूर्ण वंदे -मातरम च्या सामूहिक गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उज्वला अंधारे यांनी केले. कार्यक्रमाला हेमंत भगत, राम माताडे, रत्नाकर केकतपुरे, अनिल शास्त्री, मनोहर शिनखेडे, चार्टर्ड अकौंन्टन्ट सुनिल चोखारे आणि अनिल लांजेवार, आदि अनेक गणमान्य उपस्थित होते.

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्व.बाबुरावजी झाडे यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी, नागपूर जिल्हा शिक्षण संस्था मंडळ, नागपूर जिल्हा मुख्याध्यापक संघ या सर्व संघटनाचे माजी अध्यक्ष,माजी जिल्हा परिषद सदस्य आणि जीवनविकास एज्युकेशन सोसायटी, सिरसपेठ नागपूर चे संस्थापक कार्याध्यक्ष शिक्षणमहर्षी यांचा दि. २१/०७/२०२६ ला वयाच्या ८८ व्या वर्षी मृत्यू झाला. त्यांचे राजकीय, सामाजिक, व शैक्षणिक क्षेत्रात भरपूर योगदान होते. त्यांनी ग्रामीण व शहरी भागातील मागास भागात गरीब, कामगार, शेतकरी, शेतमजूर यांचे मुलामुलींना शिक्षण घेता यावे यासाठी त्या भागात शाळा काढून शिक्षणाची केजी टू पीजी




पर्यंतची सोय करून दिली. शेकडो गरजू लोकांना संस्थेत नोकरी देऊन त्यांचे जीवनमान उंचावले. अशा या कर्तृत्वान यशस्वी महान व्यक्तीच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी सर्वपक्षीय श्रद्धांजली सभा माजी खासदार व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे राज्य अध्यक्ष रामदास तडस यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेला प्रामुख्याने माजी मंत्री, प्रदेश काँग्रेसचे माजी प्रांताध्यक्ष रणजितबाबु देशमुख, माजीमंत्री सर्वश्री विनोद गुढधे पाटील, अनिलबाबू देशमुख, राजेंद्र मूलक, आमदार कृष्णाभाऊ खोपडे, मोहन मते, अभिजीत वंजारी, मुंबईचं माजी शिक्षक आमदार कपिल पाटील,माजी आमदार सुधाकर कोहळे, देवरावजी रडके, काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ता अतुल लोंढे, शिक्षण संस्था चालक मंडळाचे सरचिटणीस रवींद्र फडणवीस, माजी उपमहापौर शेखर सावरबांधे, शिक्षक भारतीचे राज्य महासचिव अतुल देशमुख, अध्यक्ष अशोक बेलसरे आदींनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. व स्व बाबुरावजी झाडे यांचे कार्याबद्दल गौरव उदगार काढले. सभेचे प्रास्ताविक संयोजक बळवंत मोरघडे, तर संचालन देवेंद्र काळबांडे यांनी तर आभार डॉ. देवमन कामडी यांनी मांडलेत.

याप्रसंगी त्यांची मुले शिक्षकभारतीचे राज्य उपाध्यक्ष राजेंद्र झाडे, प्रविण झाडे, नितीन झाडे, नातू मोहनीश, दुष्यंत, रोहन, साहिल झाडे, नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षक, प्राचार्य उपस्थित होते. या सभेचे यशस्वीतेसाठी विलास गभने, किशोर वरभे, ज्योती गुलहाने, माधुरी झाडे, धनश्री झाडे, भारती झाडे चंद्रभान मेहर,मुकेश मोहर्ले, विजय पाठक, बबन मंडाळे, कुशल धोतकर आदिनी परिश्रम घेतलेत.

# तहसील कार्यालय तुमसर येथे "महसूल दिन "साजरा

### महसूल विभाग सामान्य जनतेचा पाठीचा कणाः उपेश अंबादे तहसीलदार, तुमसर

**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**

भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथे आज दिनांक ३ ऑगस्टला तहसील कार्यालय येथे महसूल दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महसूल विभाग हा केवळ महसूल वसुली करणारा विभाग राहिलेला नसून नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून विकासाला चालना देणारा विभाग म्हणून



त्याचे स्वरूप बदलले आहे. महसूल विभागांतर्गत १५२ योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. शासनाच्या लोकाभिमुख धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करून शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी महसूल विभाग कटिबद्ध आहे,असे तुमसरचे तहसीलदार उपेश अंबादे यांनी महसूल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रतिपादन केले.

यावेळी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे राजू कारेमोरे आमदार तुमसर मोहाडी विधानसभा क्षेत्र, अंजली भोसले उपविभागीय अधिकारी तुमसर, उपेश अंबादे तहसीलदार तुमसर,सुभाष बारसे पोलीस निरीक्षक तुमसर, नंदू रहांगडाले माजी सभापती पंचायत समिती तुमसर, एकतापुरे-तालुका कृषी अधिकारी तुमसर, संजय जांभुळकर नायबतहसीलदार तुमसर, राहुल डोंगरे प्राचार्य, अमित रंगारी पत्रकार व ईतर मान्यवर मंडळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात महसूल विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. महसूल दिन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संजय जांभुळकर नायब तहसीलदार, तुमसर यांनी मोलाचे कार्य केले. कार्यक्रमाप्रसंगी महसूल विभागाचे सर्व कर्मचारी, तुमसर तालुक्यातील पोलीस पाटील व कोतवाल मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मेश्राम मॅडम मंडळ अधिकारी तुमसर यांनी केले.

थोडक्यात

## सालेकसा रेल्वे थांब्यासाठी खासदार राजेंद्र जैन यांचा दिल्लीत ठोस पाठपुरावा

### रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष सतीशचंद्र यांच्याशी रेल भवनात सकारात्मक चर्चा, गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील रेल्वे सुविधांवर भर

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी नवी दिल्ली येथील रेल भवन येथे गोंदिया जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार राजेंद्रजी जैन यांनी भारत



सरकारच्या रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष सतीशचंद्र जी यांची सदिच्छा भेट घेत गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील विविध रेल्वे समस्या, प्रवासी सुविधा आणि विकासकामांबाबत सविस्तर व सकारात्मक चर्चा केली. या बैठकीत गोंदिया जिल्ह्यासह सालेकसा तालुक्यासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली सालेकसा रेल्वे स्थानकावर इतवारीझबिलासपूर इंटरसिटी एक्सप्रेसला नियमित थांबा देण्याची मागणी विशेष ठळकपणे मांडण्यात आली. या मागणीचा ठोस पाठपुरावा करण्याचे आश्वासन खासदार राजेंद्रजी जैन यांनी यापूर्वीच नागरिकांना दिले होते आणि त्यानुसार त्यांनी दिल्लीत रेल्वे बोर्डाच्या सर्वोच्च स्तरावर हा विषय प्रभावीपणे उपस्थित केला.

याशिवाय प्रवाशांच्या सोयी-सुविधा, रेल्वे सेवांचा विस्तार, स्थानिक विकासाला चालना देणाऱ्या विविध रेल्वे विषयांवरही सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती मिळाली आहे. या पाठपुराव्यामुळे सालेकसा तालुक्यातील नागरिकांच्या अपेक्षांना नवी आशा निर्माण झाली असून भविष्यात या मागणीला निश्चितच सकारात्मक प्रतिसाद मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. सालेकसा तालुक्यातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, कर्मचारी, अधिकारी तसेच सर्व रेल्वे प्रवाशांच्या वतीने खासदार श्री राजेंद्रजी जैन यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत. तालुक्याच्या विकासासाठी त्यांनी केलेला हा पाठपुरावा निश्चितच मोलाचा ठरेल, अशी भावना सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

## आमगाव नगर परिषद प्रकरण तातडीने निकाली काढण्याची मागणी, अन्यथा ९ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचा इशारा




**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजू फुंडे**

आमगाव नगर परिषद स्थापनेचे प्रकरण गेल्या तब्बल ११ वर्षांपासून प्रलंबित असल्याने नागरिकांना नगर परिषदेमार्फत मिळणाऱ्या विविध विकासकामांचा व शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याचा आरोप करत आमगाव तालुका काँग्रेस कमिटीसह आठ गावांतील नागरिकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले आहे. हे निवेदन तहसीलदार, तहसील कार्यालय आमगाव यांच्या मार्फत पाठविण्यात आले असून नगर परिषद स्थापनेबाबतची अधिसूचना तातडीने काढून प्रकरण निकाली काढण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, आमगाव व परिसरातील आठ गावांतील नागरिकांना नगर परिषद अस्तित्वात नसल्यामुळे नागरी सुविधा, विकासकामे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यास अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण असून शासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत नगर परिषद स्थापनेची अधिसूचना काढून निर्णय न झाल्यास ९ ऑगस्ट २०२६ पासून तहसील कार्यालय, आमगाव समोर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. उपोषणादरम्यान उद्भवणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी शासनाची राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. या निवेदनाच्या प्रती उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे, आमदार संजय पुराम, जिल्हाधिकारी गोंदिया तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांनाही देण्यात आल्या आहेत. आमगाव नगर परिषद स्थापनेच्या मागणीला आता नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत असून शासन यावर काय निर्णय घेते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

संजय बहेकार तालुका अध्यक्ष कांग्रेस कमेटी आमगांव यांच्या नेतूत्वाखाली मोर्चा काढण्यात आला. यावेळी देवकांत बाहेकार, इसुलालजी भालेकर, रामसिंग चौहान, प्रभाताई उपगडे, पिंकेश शेंडे, जगदिश चुटे, अभयकुमार ढेंगे, योगेश कोरे, उमाकांत उईके, सुधीर टेंबुर्णे, मंगरू अंबुले, प्रल्हाद चौधरी, सोनु बानके, सिहेंद्र ठाकुर, निलेश मिश्रा, मुकीम शेख, महेश उके, छबुताई उके, राहूल चुटे, रामेश्वर श्यामकुवर, राधाकिसच चुटे, यादोराव भोयर, रितेश चुटे यांचा यावेळी समावेश होता.

## निवृत्तीवेतन धारकांसाठी महाउपलब्धी ॲपबाबत उद्या विशेष बैठकीचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

निवृत्तीवेतनधारकांना पेंशनबाबतच्या सर्व सुविधा एका छताखाली मिळाव्यात यासाठी वित्त विभागाने महा-उपलब्धी ॲप विकसीत केले असून आता कोणत्याही सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला घर बसल्या मोबाईलवर नमूद सेवांचा लाभ घेता येईल. या नवीन ॲपबाबत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना माहिती व्हावी, यासाठी व पेंशनविषयक कोणाच्या अडचणी असल्यास त्याचे निराकरण करण्याच्या उद्देशाने ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ कोषागार अधिकारी अमित मेश्राम यांनी दिली.

या बैठकीत महाराष्ट्र शासनाचा महाउपलब्धी ॲपचे प्रात्यक्षिक तसेच इतर विविध डिजीटल ॲप सेवांची माहिती पेंशन धारकांना देण्यात येईल. नागपूर जिल्हातील जास्तीत जास्त निवृत्तीवेतन धारकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याकरिता या बैठकीला उपस्थित रहावे, असे आवाहन वरिष्ठ कोषागार अधिकारी अमित मेश्राम यांनी केले आहे.

# सेवा हा भारताच्या संस्कृतीचा डीएनए : विजयराज पुराणिक

### हरगोविंद वनवासी छात्रावासला 'सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार' प्रदान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सेवा ही भारताला बाहेरून शिकवलेली संकल्पना नसून ती आपल्या संस्कृतीचा आणि जीवनपद्धतीचा अविभाज्य भाग आहे. सेवा हा भारताच्या संस्कृतीचा डीएनए आहे. समाजातील समस्यांवर टीका करण्याऐवजी 'हा समाज माझा आहे' या भावनेने स्वतः उपाय शोधणारी वृत्तीच खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मिती घडवते, असे प्रतिपादन सेवाभारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री विजयराज पुराणिक यांनी केले.

धरमपेठ शिक्षण संस्था, नागपूर यांच्या वतीने आयोजित 'सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार-२०२६' वितरण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. धरमपेठ शिक्षण संस्थेच्या प्राचार्य विनायकराव फाटक स्मृती सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात यंदाचा पुरस्कार हरगोविंद वनवासी छात्रावास, धारणी (जि. अमरावती) या संस्थेला प्रदान करण्यात आला. यावेळी हरगोविंद वनवासी छात्रावास, धारणी यांच्या वतीने चंद्रशेखर राठी, रतन लक्ष्मणदास परिहार, दीपक भागवत आणि डॉ. सुनील शेषराव यांनी पुरस्कार स्वीकारला. हा पुरस्काराचे पाचवे वर्ष आहे. यावेळी अध्यक्षस्थानी धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उल्हास औरंगाबादकर होते. व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष दीपक दुधाणे, सचिव सुरेश देव आणि पुरस्कार समिती सदस्य डॉ. कुमार मुकुंद शास्त्री उपस्थित होते.

पुराणिक म्हणाले की, भारतातील प्रवाशांसाठीच्या धर्मशाळा, गावातील कोणीही उपाशी राहू नये यासाठी प्रयत्न करणारे ग्रामनेते आणि नर्मदा परिक्रमेतील परिक्रमावासीयांची निस्वार्थ सेवा करणारे जनजातीय बांधव ही भारतीय सेवाभावाची जिवंत उदाहरणे आहेत. सेवाकार्यात उपकाराची भावना नसून कर्तव्याची भावना असावी. समाजातील व्यक्तीला केवळ स्वावलंबी बनवणे नव्हे, तर दुसऱ्यालाही आधार देणारे नेतृत्व निर्माण करणे हे सेवेचे अंतिम उद्दिष्ट आहे, असे त्यांनी सांगितले.



अध्यक्षीय भाषणात उल्हास औरंगाबादकर यांनी विदर्भातील धारणी, भंडारा, एटापल्ली, जळगाव जामोद आदी दुर्गम भागांत कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्थांची ओळख नागपूरकरांना करून देण्याच्या उद्देशाने या पुरस्कारांची सुरुवात करण्यात आल्याचे सांगितले. धरमपेठ शिक्षण संस्था स्वावलंबनाची परंपरा जपत असून, कार्यक्रमातील मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि स्वागतगीत यांसारख्या सर्व गोष्टी शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केल्याचे त्यांनी नमूद केले.

सेवाभावी संस्थांशी सातत्याने संवाद आणि सहभाग वाढवण्यासाठी 'सोशल टूरिझम' ही संकल्पना राबविण्यात येणार असून, एनएसएस, एनसीसी आणि स्काउटचे विद्यार्थी व शिक्षक सेवाभावी संस्थांना भेट देऊन तेथील कार्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी प्रचारक प्रफुल्ल वैद्य यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी अनिरुद्ध देशपांडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वागतगीत सादर केले. डॉ. कुमार मुकुंद शास्त्री यांनी प्रास्ताविक केले. खुशाली खोडपे यांनी समारोपाला पसायदान सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता गार्गे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुरेश देव यांनी केले.

**पहिल्या पुरस्काराचा आनंद - रतन परिहार**

पुरस्कार स्वीकारल्यानंतर हरगोविंद वनवासी छात्रावास संस्थेचे अध्यक्ष रतन लक्ष्मणदास परिहार यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समिती, अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रफुल्ल वैद्य यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या वसतिगृहाला ३२ वर्षे पूर्ण झाली आहेत. दुर्गम मेळघाटातील आदिवासी व होतकरू विद्यार्थ्यांना येथे मोफत निवास व भोजनाची सुविधा दिली जाते. दहा विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या या वसतिगृहात आज ५० विद्यार्थी शिक्षण घेत असून, महिला सक्षमीकरण, संगणक प्रशिक्षण, संस्कृत शिक्षण आणि मुलींसाठी जुडो-कराटे प्रशिक्षण असे विविध उपक्रमही राबविले जात आहेत.

## देशभक्तीपर गीतांच्या जोशपूर्ण स्वरांनी दुमदुमले सभागृह

### राज्यस्तरीय खासदार चषक आंतरशालेय समूहगान स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला उत्साहात प्रारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यभरातून आलेल्या शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांच्या जोशपूर्ण स्वरांनी सोमवारी कविवर्य सुरेश भट सभागृह दुमदुमून गेले. विद्यार्थ्यांच्या सुरेल समूहगायनातून राष्ट्रप्रेम, देशभक्ती आणि राष्ट्रीय



एकात्मतेचा जागर झाला.

स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, बालकला अकादमी आणि नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या राज्यस्तरीय खासदार चषक आंतरशालेय देशभक्तीपर समूहगान स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे उद्घाटन संस्कार भारतीच्या अध्यक्ष कांचनताई गडकरी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले.

रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित उद्घाटन सोहळ्याला स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस, बालकला अकादमीच्या अध्यक्ष मधुरा गडकरी, सीमा फडणवीस, गायक श्याम देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय भूपृष्ठ परिवहन व राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रेरणेतून आयोजित या स्पर्धेला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. स्पर्धेत १०६ शाळांमधील सुमारे १,५०० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सुबोध आष्टीकर, सचिन बक्षी, अशपाक शेख, विक्रांत साल्पेकर, भूषण कांडलकर आदी परिश्रम घेत आहेत.

## विक्रीपूर्वी ग्राहकांना शिक्षित करा; विश्वास हीच व्यवसायाची खरी ताकद : पंकज जयस्वाल



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

"भविष्य त्या व्यवसायांचे आहे जे विक्री करण्यापूर्वी ग्राहकांना शिक्षित करतात. केवळ उत्पादन विकणे नव्हे, तर ग्राहकांच्या समस्येचे योग्य समाधान देणे हीच यशस्वी विक्रीची गुरुकिल्ली आहे," असे प्रतिपादन उद्योजक व व्यवसाय रणनीतीकार इंजि. पंकज जयस्वाल यांनी केले. विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशन (व्हीएमए)च्या साप्ताहिक ज्ञानसत्रात चिटणवीस सेंटर येथे आयोजित 'सेल्स का जुगाड शास्त्र' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

रिटेल, होलसेल आणि उत्पादन क्षेत्रातील अनुभवाच्या आधारे त्यांनी ग्राहकांच्या बदलत्या मानसिकतेवर प्रकाश टाकला. आजचा ग्राहक खरेदीपूर्वी उत्पादनाची संपूर्ण माहिती जाणून घेण्यास प्राधान्य देत असल्याने 'कन्सल्टेटिव्ह सेलिंग'ची गरज वाढली आहे. ग्राहकांच्या गरजा समजून घेणे, योग्य प्रश्न विचारणे, त्यांना अनुरूप उपाय सुचविणे आणि विक्रीनंतरही सातत्याने सेवा देणे हे व्यवसायाच्या यशाचे महत्त्वाचे सूत्र असल्याचे त्यांनी सांगितले.

डिजिटल युगात लिंक्डइन, इन्स्टाग्राम, यूट्यूब, व्हॉट्सॲप बिझनेस, गुगल बिझनेस प्रोफाइल आणि माहितीपूर्ण व्हिडिओ यांच्या प्रभावी वापरावर त्यांनी भर दिला. ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यासाठी अनुभवकथा, ग्राहकांच्या प्रतिक्रिया, संस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती आणि डेटा-आधारित सादरीकरण उपयुक्त ठरते, असे त्यांनी स्पष्ट केले. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विक्री प्रक्रिया अधिक प्रभावी बनविणारे महत्त्वाचे साधन असल्याचे सांगत त्यांनी विक्री ई-मेल, प्रस्ताव, ग्राहकांशी संवाद आणि फॉलो-अपमध्ये एआयचा वापर करण्याचा सल्ला दिला.

यावेळी सत्राचे संचालन योगेश खंडेलवाल यांनी केले. मुख्य व्याख्यानापूर्वी महिन्याचे ओनर सुनील बजाज यांनी व्यवसाय वृद्धीसाठी व्हॉट्सॲप समूहांचा प्रभावी वापर कसा करावा याविषयी उपयुक्त मार्गदर्शन केले.

## बहुभाषिकांसाठी नोकरीच्या अनेक संधी : डॉ. मेधा कानेटकर

### श्री निकेतन महाविद्यालयात पाच दिवसांची कार्यशाळा उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री निकेतन महाविद्यालयातील इंग्लिश विभागांतर्गत मल्टीलिंग्यूवल माईड्स ग्लोबल करिअर या विषयावर पाच दिवसीय कार्यशाळा नुकतीच घेण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. कानेटकर यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भाषांमध्ये नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. कॉलेजमध्ये फ्रेंच आणि जर्मन हे दोन कोर्सेस चालवले जातात. त्यांचा विद्यार्थ्यांनी अवश्य लाभ घ्यावा. कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे रोजगार कौशल्य वाढवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असे त्या म्हणाल्या.

डॉ. कांचन जोशी व डॉ. मृण्मयी कानेटकर यांनी फ्रेंच आणि जर्मन या भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी मूलभूत माहिती दिली. इंग्लिश, फ्रेंच आणि जर्मन या तिन्ही फॉरेन विषयांमध्ये नोकरीच्या उपलब्ध संधी यावर प्रा. घटोत्कच ठेंगरे यांनी प्रकाश टाकला. प्रा. स्नेहा पोपटे यांनी मुलाखतीचे तंत्र या विषयावर माहिती दिली. समारोपीय भाषणात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र मालोकर यांनी बहुभाषिकत्त्वाचे महत्व विशद केले. या कार्यशाळेला विद्यार्थी व प्राध्यापकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

## "जयंती २"मध्ये संत्या स्वीकारणार एक ज्वलंत चॅलेंज!

### शैलेश नरवाडे घेऊन येताहेत लोकप्रिय "जयंती" चित्रपटाचा दुसरा भाग, ११ सप्टेंबरला प्रदर्शित होणाऱ्या "जयंती २" ची सगळीकडे चर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त**

आजच्या या तरुण पिढीवर छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीचा पडणारा प्रभाव आणि विचारांमधून समाजात होणारा सकारात्मक बदल यावर भाष्य करणारा "जयंती" हा चित्रपट २०२१ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला होता. आता तब्बल पाच वर्षांनंतर या चित्रपटाचा सिक्वल म्हणजेच "जयंती २" हा चित्रपट येत्या ११ सप्टेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होण्यास सज्ज झाला आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लॉंच करण्यात आले.




"जयंती २" या चित्रपटाची निर्मिती मेलिओरिस्ट फिल्म स्टुडिओने केली असून चित्रपटाची कथा, संवाद आणि दिग्दर्शन शैलेश बळीराम नरवाडे यांचे आहे.

"जयंती" चित्रपटाचा प्रमुख चेहरा असलेला अभिनेता ऋतुराज वानखेडे या चित्रपटात मध्यवर्ती भूमिका साकारत असून अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर, रोहिणी हट्टंगडी, देविका दफ्तरदार, विजय निकम, राजकुमार जरांगे, मानसी सुभाष अशी दमदार कलाकारांची फौज आपल्याला या चित्रपटातून भेटीस येणार आहे. संजीवकुमार हिल्ली यांनी कॅमेरामन म्हणून काम पाहिले असून संकलन फैसल महाडिक यांचे आहे. डॉ. सुहास अंबादे, सुहास मुंडे आणि सौरभ गुरु यांनी लिहिलेल्या गीतांना ओंकारस्वररूप यांचे संगीत लाभले असून पार्श्वसंगीत मंगेश धाकडे यांचे आहे.

"जयंती" चित्रपटाच्या पहिल्या भागाला त्याच्या वेगळ्या विषयामुळे रसिक प्रेक्षकांचा चित्रपटाला उत्तम प्रतिसाद मिळाला होता. मुख्यतः चित्रपटाचा विषय हा विशेषतः तरुणाईच्या मनाला भिडला होता. त्याच्या मनात असलेली भावना ही चित्रपट माध्यमातून दाखविण्यात आली होती. "जयंती २" च्या चित्रीकरणाला सुरुवात झाली तेव्हा पासूनच प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली होती. आता "जयंती २" मध्ये नक्की काय घडणार? कथानक कोणते रंजक वळण घेणार? यासाठी रसिक प्रेक्षकांना अजून थोडी वाट पहावी लागणार असून मला खात्री आहे की प्रेक्षकांना "जयंती २" नक्कीच आवडेल असे चित्रपटाचे दिग्दर्शक शैलेश नरवाडे यांनी सांगितले.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : मंगळवार, ४ ऑगस्ट २०२६

थोडक्यात

## जंगलातील पर्यटनस्थळ बनत आहेत वन्यजीवांसाठी धोकादायक

### जंगलातील झाडे, गवत, वनस्पतीचे अस्तित्व धोक्यात

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा-धर्मेंद्र शेरकुरे**

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये अनेक नागरिक मोठ्या प्रमाणात पिकनिक, वाढदिवस पार्टी साजरा करण्यासाठी जंगलाच्या पर्यटन स्थळी जात असून जंगलामध्ये असलेली वनस्पती,झाडे, गवत नष्ट



होत असून पर्यटन स्थळ वन्य प्राण्यांसाठी खतरा बनत आहे. चिमूर तालुक्यातील मुक्ताई धबधबा हा ६० फुटावरून पावसाळ्याच्या दिवसांमध्ये वाहत असून येथे असलेले मुक्ताई देवस्थान हे एक जनतेचे धार्मिक श्रद्धास्थान आहे. या ठिकाणी परिसरातील जनतेकडून नागदिवाळी सप्ताह साजरा केला जातो.

पावसाळ्यात या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आनंद साजरा करण्यासाठी पर्यटक दरवर्षी विदर्भातील चंद्रपूर, भंडारा,वर्धा, यवतमाळ, गडचिरोली,नागपूर गोंदिया, अमरावती ,जिल्ह्यातून येत असतात नेहमीच पावसाळ्याच्या दिवसांमध्ये जंगल मोठ्या प्रमाणात हिरवागार होतो . यामुळे वनस्पती,गवत, झाडे हे हिरवी दिसत असून जंगलातील वन्य प्राण्यांसाठी साठी गवत,वनस्पती, झाडे आपले जीवन जगण्यासाठी उपयुक्त ठरत असतात परंतु या ठिकाणी नेहमीच दुचाकी,चार चाकी वाहनाने हजारोच्या संख्येने येणारे पर्यटकामुळे हे नष्ट होण्याच्या मार्गावर आलेले आहे.

या परिसरामध्ये मोठे दगड, दरी, झाडे झुडपी जंगल,गवत, आयुर्वेदिक वनस्पती असल्याने त्या ठिकाणी वाघ, अस्वल, बिबट,सांबर चितंल, रानगवा, रानडुक्कर,नीलगाय, बंदर, जंगली कुत्रे, ससा खारुताई, फुलपाखरे तसेच ईतर प्राणी वास्तव करत एकमेकाचा अन्नसाखळी चा भाग बनत जीवन जगत असतात त्यामुळे पावसाळ्यात येथे येणाऱ्या पर्यटकामुळे येथील आयुर्वेदिक वनस्पती, छोटे किडे,गवत, झाडे सरपटणारे प्राणी नष्ट होत असून येथील वन्य प्राणी जंगला लगत असलेल्या गावात, शेत शिवारात आपल्या आश्रय घेण्यासाठी फिरत असतात. येथे येणारे पर्यटक हे याठिकाणी पार्टी,जेवणाचे नियोजन करत असून त्या ठिकाणी प्लास्टिक पात्र, वाटी, ग्लास, दारूची बॉटल, पन्नी मोठ्या प्रमाणात जंगल परिसरात टाकत असून हे वन्य प्राण्यांसहित, पर्यावरणासाठी घातक ठरत आहे.

तसेच याच परिसरात १७ जुलै २०२३ मध्ये डोमा येथील डोमळु सोनवणे यांच्या वाघाच्या हमल्यात मृत्यू झाला असता मुक्ताई धबधबा वनविभागाकडून मागील एक महिन्याच्या वर बंद ठेवण्यात आला असता शेगाव बु.येथील युवक हे मुक्ताई धबधबा पाहण्यासाठी गेले असता बंद असल्याने ते नागभीड तालुक्यातील घोडाझरी तलाव येथे गेले असता चार युवकांना आपला जीव गमवावा लागण्याची घटना घडली होती त्यामुळे वन्य प्राण्यांचे जंगलाचं अस्तित्व टिकवण्यासाठी प्रशासनाकडून ठोस उपयोजना करण्याची मागणी वन्यजीव प्रेमी कडुन करण्यात येत आहे. या संदर्भात वनपरिक्षेत्र अधिकारी चिमूर देऊळकर यांना विचारपूस केली असता मुक्ताई धबधबा हा महसूल विभागाच्या भागांमध्ये येत असून त्या ठिकाणी मुक्ताई समिती डोमा, तसेच फॉरेस्ट गार्ड, पीआरटी टीमकडून येणाऱ्या पर्यटकांना वन्य प्राण्यांसंदर्भातल्या सूचना दिल्या जातात.

## टाटा शोरूममध्ये लाखाची रोकड लंपास, दोन दिवसांत गुन्ह्याचा छडा, उमरेडचा आरोपी अटकेत



**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

पडोली परिसरातील जायका मोटर्स प्रायव्हेट लिमिटेड (टाटा शोरूम) येथे डिजिटल तिजोरी फोडून १ लाख ८ हजार ८२९ रुपयांची रोकड चोरी करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या दोन दिवसांत अटक केली आहे. आरोपीकडून चोरीतील काही रोख रक्कम तसेच गुन्ह्यात वापरलेले टाटा हॅरियर वाहन असा २० लाख ५७ हजार १४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. प्राप्त माहितीनुसार, शोरूमचे सर्व्हिस मॅनेजर आकांत रमेश गुजरकर ३६ वर्ष, रा. गुरुदेवनगर, पडोली, चंद्रपूर यांनी रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या तक्रारीनुसार, ३१ जुलै रोजी महिनाअखेरची क्लोजिंग सुरू असल्याने कार्यालयात वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दिवसभरातील व्यवहारातून जमा झालेली १ लाख ८ हजार ८२९ रुपयांची रोकड कॅशिअर विशाखा दुबे यांनी संगणकीय नोंद करून गोदरेज कंपनीच्या डिजिटल तिजोरीत ठेवून ती पासवर्डद्वारे लॉक केली होती. रात्री कार्यालय बंद करून सर्व कर्मचारी निघून गेले.

दुसऱ्या दिवशी १ ऑगस्ट रोजी सकाळी कार्यालयातील आलमारीचे कुलूप तुटलेले असल्याची माहिती मिळाल्यानंतर आकांत गुजरकर घटनास्थळी पोहोचले. पाहणी केली असता, कार्यालयाच्या कोपऱ्यातील ग्रिल नसलेल्या खिडकीतून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून आलमारीचे कुलूप तोडले होते. याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९७४/२०२६ दाखल करण्यात आला. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी प्रथम प्रभाकर दडमल २४ वर्ष, रा. उमरेड, जि. नागपूर याला ताब्यात घेतले.

चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्याच्याकडून चोरीतील ५७ हजार १४० रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेले टाटा हॅरियर वाहन जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत २० लाख ५७ हजार १४० रुपये इतकी आहे. या प्रकरणात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०५ व ३३१(४) अंतर्गत कारवाई करण्यात आली असून, आरोपीला पुढील तपासासाठी रामनगर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचा नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक दीपक कॉंक्रेडवार, योगेश हीवसे, पोलीस उपनिरीक्षक विनोद भुरले, सर्वेश बेलसरे, सुनील गौरकार, पोहवा सतीश अवथरे, इम्रान खान, लालू यादव, हिरालाल गुप्ता, पोअं किशोर वाकाटे, शशांक बदामवार यांनी केले.

# आ. विकास ठाकरे यांनी केली पूरग्रस्त भागांची पाहणी

### तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

२८ जुलै रोजी झालेल्या पावसामुळे पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघातील प्रशांत नगर, सादिकाबाद, मानसरोवर नगर, झिंगाबाई टाकळी, गोरेवाडा, महेश नगर, स्वागत नगर, सूरज नगर व इतर निवासी भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी घरांमध्ये शिरले.

सांडपाण्यासह आलेल्या पावसाच्या पाण्यामुळे नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून अन्नधान्य, विद्युत व इलेक्ट्रॉनिक उपकरणे, फर्निचर, कपडे तसेच इतर घरगुती साहित्य पूर्णपणे खराब झाले. या पार्श्वभूमीवर पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी कॉंग्रेसचे नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह आज बाधित भागांना भेट देऊन नागरिकांची प्रत्यक्ष भेट घेतली, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि नुकसानाची पाहणी केली. नागपूर महानगरपालिकेचे अभियंते देखील उपस्थित होते. त्यानंतर आमदार विकास ठाकरे यांनी नागपूर महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांची भेट घेऊन बाधित भागांमध्ये तातडीने पंचनामे (सर्वेक्षण) करण्याचे तसेच प्रत्येक नुकसानग्रस्त कुटुंबाला शासनाच्या नियमानुसार त्वरित आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्याची मागणी केली.

यावेळी आमदार ठाकरे यांनी सांगितले की, पावसामुळे नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून अनेक कुटुंबांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे प्रशासनाने कोणताही विलंब न करता तातडीने सर्वेक्षण पूर्ण करून पात्र लाभार्थ्यांना नुकसानभरपाई वितरित करावी. तसेच भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी संबंधित भागांतील पावसाच्या पाण्याचा निचरा, सांडपाणी व्यवस्थापन आणि जलनिकासी यंत्रणा सक्षम करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात. आमदार विकास ठाकरे यांनी प्रशासनाला नागरिकांना त्वरित दिलासा देण्यासाठी युद्धपातळीवर कार्यवाही करण्याचे आवाहन केले.

**वन व झुडपी जंगलाच्या जमिनी अतिक्रमणमुक्त करा: विकास ठाकरे**

पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी आज उपवनसंरक्षक (उत्तर) डॉ. विनिता व्यास यांची भेट घेऊन पश्चिम नागपुरातील वन विभागाच्या तसेच झुडपी जंगलाच्या जमिनीवरील अतिक्रमणे तातडीने हटविण्याची मागणी केली.

विशेषतः झिंगाबाई टाकळी येथील टॉवर लाईन परिसरासह पश्चिम नागपुरातील विविध भागांमध्ये वन व झुडपी जंगलाच्या जमिनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याचे ठाकरे यांनी डॉ. व्यास यांच्या निदर्शनास आणून दिले. या अतिक्रमणांमुळे परिसरातील नागरिकांना विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची माहितीही त्यांनी या भारतीय वन सेवा अधिकाऱ्यांना दिली.

वन व झुडपी जंगलाच्या जमिनींचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करून संबंधित जमिनी अतिक्रमणमुक्त कराव्यात, अशी मागणी आमदार ठाकरे यांनी केली.

## धरणातील जल साठ्यामुळे तालुक्यातील अर्थचक्राला गती

### चारगाव बु. धरणात ७२.२३%, निमढेला तलाव ५१.७३% तर भटाळा ६५.२६% जलसाठा, शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त, दरवर्षी १५ ऑगस्टला सोडण्यात येते धरणाचे शेती पिकासाठी पाणी

**दै.सिंहवाणी वृत्त, वरोरा धर्मेंद्र शेरकुरे**

वरोरा तालुक्यातील पाटबंधारे विभाग अंतर्गत येत असलेल्या धरण,मध्यम प्रकल्प, लघु प्रकल्प तीन दिवसापासून पडत असलेल्या संततधार पावसामुळे ७०% च्या वर भरली असून भूज जल साठ्यावर अवलंबून असणाऱ्या शेतकरी शेतातील कामात व्यस्त झालेला आहे.

तालुक्यात मोठ्या प्रमाणात हजारो हेक्टर शेती क्षेत्र असून शेतीचा हंगामाला सुरुवात झालेली आहे. या हंगामामुळे ग्रामीण भागाच्या अर्थचक्राला गती मिळाली असून शेतकरी, शेतमजूर कामात व्यस्त झालेला आहे, परिसरातील शेतकऱ्यांनी मे, जुन महीन्यात शेतीची मशागत करत शेतीमध्ये कपास, सोयाबीन, तुर सहीत धान पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात केली आहे. परिसरात झालेल्या पावसामुळे धरण, लघु प्रकल्प, गावाशेजारी असलेली तलावाची पातळी वाढली असून शेतीसाठी



लागणाऱ्या पाण्याची चिंता सध्या तरी मिटलेली आहे.

शेगाव परिसरामध्ये चारगाव बु. मध्यम प्रकल्प,चंदई मध्यम प्रकल्प, शेगाव बु. लघु प्रकल्प, शेगाव खुर्द लघु प्रकल्प,भटाळा लघु प्रकल्प, येत असून तलावातील जलसाठ्यात वाढ झाली,उन्हाळ्यात प्रकल्पाच्या ३१ मे २६ च्या अहवालानुसार चारगाव धरण, मध्यम प्रकल्प मध्ये १७.३३६ पाणीसाठा, चंदई मध्यम प्रकल्प १०.६९, पाणी साठा,शेगाव बुज लघु प्रकल्प १.४३१ पाणीसाठा,शेगाव खुर्द लघु प्रकल्प ०.५९७७ पाणीसाठा असुन यामध्ये जुन,जुलै दोन महिन्याच्या कालावधीमध्ये चारगाव बु. धरणात जुलै च्या शेवटपर्यंत ७२.२१% पाणीसाठा असुन यामध्ये पावसाळ्यात ५०% वर ने वाढ झालेली आहे. या सिंचना अंतर्गत २१ किलोमीटर अंतर येत असून मोठ्या प्रमाणात चिमूर तालुक्यातील परिसरातील पाणी या धरणात जमा होत असते वरोरा, भद्रावती तालुक्यातील शेती पिकासाठी याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पाणी सोडण्याचे काम येथून होत असून बोरगाव कवडशी, चारगाव खु,चारगाव बु.मानोरा, कारेगाव, धानोली, दादापूर,नवरगाव रिठ,शेगाव खु. पारोधी, चंदनखेडा, चंदनखेडा मक्ता, चरुड,चरुड दारापुरे येत असतात.

तसेच भटाळा लघु प्रकल्प मध्ये ६५.२६% जलसाठा उपलब्ध चंदई मध्यम प्रकल्प (निमढेला तलाव) ५०% वर पाणीसाठा असुन यामध्ये अर्जुनी, तुकुम, कोकेवाडा तु. विलोळा, आष्टा, बेलगाव, शिवनी तु. कोकेवाडा मानकर, काटवल भगत, वडाळा, वडाळा तु. तामसी रिठ, सोनेगाव, येथील शेती क्षेत्र येत असतात, शेगाव भुज लघु प्रकल्पा मध्ये, शेगाव बुज, दादापुर, मानोरा, खेकडा पुर रिठ, अंतापुर रिठ येथील शेती क्षेत्र येत असतात, तसेच शेगाव खुर्द लघु प्रकल्पामध्ये, शेगाव खुर्द, बोरगाव धांडे, चरुड येथील शेती क्षेत्र येत असून या परिसरात दरवर्षी १५ ऑगस्ट जलसंधारण विभागाकडून धरणाचे पाणी शेती पिकासाठी सोडल्या जाते.

तालुक्यातील धान या पिकावर अर्थव्यवस्था अवलंबून असुन धानाच्या हंगामाला जून महिन्यापासून सुरुवात होत असून डिसेंबर महिन्यापर्यंत हा हंगाम चालत असतो. या सहा महिन्याच्या कालावधीत शेतीची विविध टप्पे येत असल्याने या टप्प्यामध्ये शेतमजुरांचे अर्थचक्राला गती मिळत असुन सध्या शेतकरी, शेतमजूर कामात व्यस्त झालेला आहे.

## टेरेसवरील 'एसी प्लांट रूम'च्या गैरवापरास आळा घालण्यासाठी ७ सर्वेक्षण पथके गठीत

### १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे मनपा आयुक्तांचे निर्देश



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिका हद्दीत सध्या मोठ्या प्रमाणावर रहिवास, वाणिज्य (व्यावसायिक) आणि औद्योगिक स्वरूपाची बांधकामे सुरू आहेत. मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदींनुसार सर्व प्रकारच्या वापरांना नियमांनुसार बांधकाम परवानगी निर्गमित केली जाते. मात्र, अनेक विकासक आणि अर्जदारांनी मंजुरी मिळवताना टेरेस मजल्यावर 'एसी प्लांट रूम' दाखवून नकाशे मंजूर करून घेतले असले, तरी प्रत्यक्षात मात्र मंजूर नकाशाच्या विसंगत या जागेचा वापर केला जात असल्याचे गंभीर प्रकार मनपाच्या निदर्शनास आले आहेत. यासंदर्भात मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (ता.३) बैठक पार पडली. याप्रसंगी नगर रचना विभागाचे सहायक संचालक श्री. ऋतुराज जाधव यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. बैठकीत मंजूर नकाशाच्या विसंगत सुरू असलेला हा प्रकार अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून, या अनधिकृत वापरावर कडक कारवाई करण्यासाठीचे निर्देश मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी दिले.

या पार्श्वभूमीवर नागपूर महानगरपालिकेने ७ विशेष सर्वेक्षण पथकांची स्थापना करण्यात आली आहे. ही पथके शहरात सुरू असलेल्या अशा बांधकामांची प्रत्यक्ष पाहणी करून, "एसी प्लांट/रूमचा वापर मंजूर बांधकाम नकाशांनुसारच होत आहे की नाही?" याची सखोल तपासणी करणार आहेत. ही सर्व पथके आगामी १५ दिवसांच्या आत आपला सविस्तर अहवाल मनपा प्रशासनाला सादर करतील असेही निर्देश आयुक्तांनी दिले. आयुक्त डॉ. विपीन यांनी सांगितले की, सर्वेक्षण पथकाच्या अहवालात जर बांधकामाची मंजुरी आणि प्रत्यक्ष वापर यात तफावत किंवा विसंगती आढळल्यास, अशा बांधकामांवर 'महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६' मधील तरतुदींनुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा आयुक्तांनी दिला.

# रेल्वे चौकी मुख्य बाजारपेठेत धारदार शस्त्रांचा धुमाकूळ

### तिघे गंभीर जखमी, जुन्या वादातून हल्ल्याची शक्यता, पाच ते सहा जणांवर गुन्हे दाखल, इतर संशयितांना चौकशीअंती सोडले

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**

खापरखेडा शहरातील मध्यवर्ती मुख्य बाजारपेठ रविवारी रात्री अचानक रक्तरंजित संघर्षाने हादरली. रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास धारदार शस्त्रांनी सज्ज झालेल्या काही जणांनी तिघांवर प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात हिमांशू रवी कडू (२५) हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यासह रक्षित कापसे व रोहित मेश्राम हे दोघेही जखमी झाले आहेत. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून हिमांशूची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे.

या घटनेनंतर मुख्य बाजारपेठेत काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. माहिती मिळताच खापरखेडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिसराची



नाकेबंदी केली. या प्रकरणी पाच ते सहा जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून इतर संशयितांना चौकशीअंती सोडण्यात आल्याची माहिती यावेळी सुत्रांनी दिली. फरार आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, एक दिवसापूर्वी शहरातील एका व्यावसायिक ठिकाणी दोन गटांमध्ये वाद झाला होता. त्याच वादाचे पर्यवसान रविवारी रात्री झालेल्या हिंसक हल्ल्यात झाल्याची शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे. घटनेपूर्वी काही जणांनी परिसरात हालचाली करून लक्ष्यावर लक्ष ठेवले होते, अशीही माहिती तपासात पुढे येत आहे.

हल्ल्यावेळी हिमांशू कडू याच्यावर धारदार शस्त्रांनी वार करण्यात आल्याचे सांगितले जाते. जीव वाचविण्यासाठी तो घराच्या दिशेने धावत असताना त्याच्या मदतीला आलेल्या रक्षित कापसे व रोहित मेश्राम यांनाही मारहाण करण्यात आली. त्यानंतर हल्लेखोरांनी घटनास्थळावरून पलायन केले.

या प्रकरणात सुरज कन्हैयालाल कावळे, शुभम उर्फ शेरू अशोक उईके, संघर्ष बागडे, साहिल उर्फ



बूटऱ्या बागडे, सुदामा मधुकर छापडहाके यांच्यासह इतर अनेक जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. सर्व आरोपींचा शोध सुरू असून लवकरच अटक केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले.

घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शींचे जबाब आणि अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे. हल्ल्यामागील नेमके कारण, पूर्वनियोजन होते का आणि आणखी किती जणांचा सहभाग होता, याचा तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान, काही आरोपी तडीपार आदेशाचे उल्लंघन करून परिसरात वावरत असल्याचे तसेच पोलिसांच्या कार्यपद्धतीबाबत स्थानिक स्तरावर विविध आरोप करण्यात येत आहेत. मात्र या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसून त्याबाबत सक्षम यंत्रणेकडून चौकशी झाल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

सलग घडणाऱ्या गंभीर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर खापरखेडा शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बाजारपेठ आणि संवेदनशील भागात पोलीस गस्त वाढविण्यात आली असून फरार आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

**तडीपार गुन्हेगारांच्या कथित वावरावर प्रश्नचिन्ह**

खापरखेडा परिसरात तडीपार करण्यात आलेले काही कुख्यात गुन्हेगार कथितपणे बिनधास्त वावरत असल्याची चर्चा होत आहे. त्यांच्याकडून अवैध धंदे व अमली पदार्थांची विक्री सुरू असल्याची सुद्धा चर्चा असून, या प्रकरणात संबंधित पोलिसांच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशी करावी, तसेच सीसीटीव्ही फुटेज व कॉल रेकॉर्ड तपासावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सलील देशमुखांचा राजकीय मास्टरस्ट्रोक!

## मनसेच्या जिल्हाध्यक्षांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात जाहीर प्रवेश, नागपूरच्या राजकारणात खळबळ



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)च्या नागपूर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सलील देशमुख यांनी पक्षसंघटना विस्ताराचा सपाटा लावला असून, अवघ्या काही दिवसांत विरोधकांना मोठा राजकीय धक्का देण्यात यश मिळविले आहे. जुनी कार्यकारिणी बरखास्त करून नव्या संघटन उभारणीला सुरुवात केल्यानंतर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष व अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश घडवून आणत त्यांनी नागपूर जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडवून दिली आहे.

नागपूर येथील पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यात मनसेचे जिल्हाध्यक्ष सुरेश वांदिले यांच्यासह अनेक ज्येष्ठ व युवा पदाधिकाऱ्यांनी सलील देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)चा झेंडा हाती घेतला. या पक्षप्रवेशामुळे जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे निर्माण झाली असून, राष्ट्रवादी काँग्रेसला नवसंजीवनी मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

पक्षप्रवेश करणाऱ्यांमध्ये सुरेश वांदिले (जिल्हाध्यक्ष, मनसे), जयंत चव्हाण, भीमराव आलिलडूके, गोपाल आरोडे, वसंता आस्कर, शेखर सोनोने, प्रकाश नाईक, संतोष झाडे, बबलू सहारे, सुनील महाजन, रोशन डोंगरे, शामसुंदर नवघरे, अंतराम आरतुरकर, राजेश चौरे, श्रावण सरोदे आणि निलेश वडस्कर यांचा प्रमुख समावेश आहे.

यावेळी सलील देशमुख म्हणाले, "राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणारा पक्ष आहे. युवकांना नेतृत्वाची संधी देत पक्ष अधिक मजबूत करण्याचा आमचा निर्धार आहे. जनतेचा वाढता विश्वास आणि कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता आगामी काळात आणखी मोठ्या प्रमाणावर पक्षप्रवेश होणार आहेत."

नागपूर जिल्ह्यात आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या या पक्षबांधणी मोहिमेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विविध राजकीय पक्षांतील पदाधिकारी व कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसकडे आकर्षित होत असल्याने आगामी निवडणुकांमध्ये त्याचे पडसाद उमटण्याची शक्यता राजकीय जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे.

या पक्षप्रवेश सोहळ्यास कपिल वानखेडे, शैलेंद्र तिवारी, पंकज चुकाबे, स्वप्नील कावळे, संतोष कुमार, गौरव गजघुमे यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्याने प्रवेश केलेल्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करत पक्ष संघटना गावागावांत बळकट करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. नागपूर जिल्ह्यात सलील देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या संघटन विस्तार मोहिमेमुळे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाला नवचैतन्य प्राप्त झाले असून, आगामी राजकीय घडामोडींमध्ये या पक्षप्रवेशाची चर्चा केंद्रस्थानी राहणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

थोडक्यात

## क्रांतिसिंह नाना पाटील यांना जयंतीदिनी अभिवादन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नागपूर येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीदिनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग प्रसाद कुळकर्णी नागपूर यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. यावेळी सहाय्यक संचालक वित्त व लेखा अतुलकुमार वासनिक हे प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी सहाय्यक लेखाधिकारी ईशा भूते, अनामिका बाराहाते, दिपक कुसरे, मनोहर उचे, छाया बागडे, निलोफर अली, दिनेश सुखदेवे, आरती सुखदेवे, अर्चना सातघरे, सारीका बोरकर, जयश्री धवराळ, प्रिती भांगे, गणेश बच्छे, हेमंत खवशी, विवेक दांडेकर, विवेक गजभिये, गजानन शेळके, अमित कांबळे, चंदन त्रिमले, सुहानी कोवे, प्रतिभा डागोर, वैभव भारती तसेच प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग नागपूर कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदारांनी ८ ऑगस्टपूर्वी गणना अर्ज जमा करावेत

### बीएलओंना सहकार्य करण्याचे मतदारांना आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नागपूर उत्तर (अ.जा.) विधानसभा मतदार संघामध्ये मतदार यादीचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत मतदारांकडून गणना अजार्चे वितरण, संकलन आणि डिजिटायझेशनचे काम सुरू असून, सदर कामकाज पुर्ण करण्याची अंतिम मुदत ८ ऑगस्ट २०२६ आहे. मतदारसंघातील ज्या मतदारांना गणना अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यांनी अजार्तील आवश्यक माहिती अचूकपणे भरून, स्वाक्षरी करून आणि आवश्यक कागदपत्रांसह संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अर्थात बीएलओंकडे तातडीने जमा करावा. गणना अर्ज अद्याप प्राप्त न झाल्यास किंवा अर्ज भरण्यासंदर्भात अडचण असल्यास संबंधित बीएलओशी संपर्क साधावा.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत शनिवार व रविवारसह विविध भागांमध्ये विशेष शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. बीएलओ तसेच राजकीय पक्षांचे बूथ लेव्हल एजंट यांच्या समन्वयातून घरोघरी भेटी देऊन प्रलंबित अर्जाचे संकलन करण्यात येणार आहे. मतदारांनी आपल्या नावाची नोंद, पत्ता, छायाचित्र आणि इतर तपशील योग्य असल्याची खात्री करावी. स्थलांतरित, अनुपस्थित, मृत अथवा दुबार नोंद असलेल्या मतदारांबाबत वस्तुनिष्ठ माहिती बीएलओंना उपलब्ध करून द्यावी. मतदारांनी शेवटच्या दिवसाची प्रतीक्षा न करता ८ ऑगस्ट, २०२६ पूर्वी गणना अर्ज जमा करून राष्ट्रीय महत्त्वाच्या या कामात प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन नागपूर उत्तर (अ.जा.) विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी यांनी केले आहे.

## कोदामेंढी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सवानिमित्त महाप्रसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

संपूर्ण महाराष्ट्रात लोकशाहीर, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीमहोत्सव सुरू असून,रविवार (ता.२ ऑगस्ट) ला अण्णाभाऊ साठे चौक, कोदामेंढी येथे लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन व महाप्रसादाच्या कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी लोकशाहीरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले व त्यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि परिवर्तनवादी कार्याचे स्मरण केले.

या कार्यक्रमाला भगवान बावनकुळे भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष, गोपाल गिरमेकर उपसरपंच, ग्रा.पं. कोदामेंढी,नरेश बावनकुळे सामाजिक कार्यकर्ते, विष्णू बावनकुळे, कोमल खडसे ग्रामपंचायत सदस्य, पंकज खडसे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, पत्रकार शैलेश वाघमारे, नरेश बावणे, रवि बावणे, शुभम बावणे, हरीश बावणे, देवानंद मेश्राम, गोपाल हटवार, सुभाष बावनकुळे तसेच समाजातील बांधव व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑनलाईन तक्रारीची तातडीने दखल, अंबाजोगाईत चायनीज सेंटरवर एफडीएची धडक कारवाई

**बीड** : बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे अन्न व औषध प्रशासनाने प्राप्त झालेल्या ऑनलाईन तक्रारीची तातडीने दखल घेत एक मोठी कारवाई केली आहे. अंबाजोगाई शहरातील सदर बाजार भागातील 'तवक्कल चायनीज सेंटर'वर एफडीएच्या पथकाने अचानक धाड टाकत कारवाईचा बडगा उगारला. या कारवाई दरम्यान हॉटेलमधील अन्नपदार्थांचे नमुने ताब्यात घेण्यात आले असून, आवश्यक परवाना मिळेपर्यंत संबंधित चायनीज सेंटर पूर्णपणे सील करण्यात आले आहे.

अंबाजोगाई आणि केज परिसरात नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड केली जात असल्याच्या तक्रारी अन्न व औषध प्रशासनाकडे सातत्याने येत होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत एफडीएच्या बीड पथकाने थेट घटनास्थळी जाऊन ही कारवाई केली.एफडीए पथकाने केलेल्या तपासणीदरम्यान तवक्कल चायनीज सेंटर हे कोणत्याही वैध परवान्याशिवाय चालवले जात असल्याचे उघडकीस आले. याशिवाय, हॉटेलमध्ये आणि अन्न तयार करण्याच्या ठिकाणी अत्यंत अस्वच्छता आढळून आली.

## वनार्टीमध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



लोकशाहीर तथा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या स्व. वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) येथे अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक मा. प्रशांत वावगे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला विनम्र अभिवादन केले.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना मा. प्रशांत वावगे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा सविस्तर आढावा घेतला. औपचारिक शिक्षणाची संधी जवळपास मिळाली नाही, मात्र जिद्द, प्रतिभा आणि समाजाविषयीची प्रखर बांधिलकी यांच्या बळावर त्यांनी मराठी साहित्यविश्वात अजरामर ठसा उमटविला. सांगली जिल्ह्यातील वाटेगाव या छोट्याशा गावातून सुरू झालेला त्यांचा जीवनप्रवास थेट जनसामान्यांच्या हृदयापर्यंत पोहोचला. कादंबऱ्या, कथा, पोवाडे, लावण्या आणि लोकनाट्याच्या माध्यमातून त्यांनी वंचित, श्रमिक आणि उपेक्षित समाजाचा आवाज बुलंद केला. 'फकीरा' ही त्यांची कादंबरी आजही मराठी साहित्याचा मैलाचा दगड मानली जाते.

शिक्षणापासून वंचित राहिलेल्या व्यक्तीच्या साहित्याचा गौरव थेट रशियासारख्या देशात होतो, ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब असल्याचेही मा. प्रशांत वावगे यांनी सांगितले. कार्यक्रमाला प्रकल्प व्यवस्थापक डॉ. चेतन बन्सोड यांच्यासह 'वनार्टी'चे अधिकारी, कर्मचारी, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नागपूरच्या संचालकपदी डॉ. सुर्यवंशी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नाशिक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नागपूर विभागीय संचालकपदी वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. शरद सुर्यवंशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ३१ जुलै रोजी त्यांनी मावळते संचालक डॉ. धनंजय वेळुकर यांच्याकडून पदभार स्वीकारला. याप्रसंगी डॉ. पांडुरंग डांगे, डॉ. नितीन जंगीटवार, डॉ. मनोज आंबटकर यांची उपस्थिती होती.

डॉ. शरद सुर्यवंशी यांनी यापूर्वी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक म्हणून कार्यभार सांभाळला आहे. तत्पूर्वी त्यांनी शारीरिक शिक्षण महाविद्यालय कोराडी(तायवाडे कॉलेज) तसेच गुलाब नबी आझाद शारीरिक शिक्षण महाविद्यालय येथे प्राचार्य म्हणून कार्य केले आहे. रमेश धवड शारीरिक शिक्षण महाविद्यालय नागपूर येथून त्यांनी आपल्या शैक्षणिक सेवेची सुरुवात केली होती. शारीरिक शिक्षण विषयात आचार्य पदवी घेतलेले डॉ. सूर्यवंशी हे माजी आंतरराष्ट्रीय धावपटू असून वार्सा पोलंड येथे झालेल्या क्रॉस कंट्री स्पर्धेत त्यांनी भारताचे प्रतिनिधीत्वही केले होते. त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात त्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये २ सुवर्ण व ५ रौप्य आणि एक कांस्यपदक प्राप्त केले आहे.

विद्यार्थी संघटनेच्या निवडणूकीत ते विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवडून आले होते. एनसीसीचे बेस्ट कॅडेट म्हणून त्यांना पुरस्कार प्राप्त असून राष्ट्रीय शालेय स्पर्धेत त्यांना बेस्ट अथलीटचा खिताबही मिळाला होता. अ. भा. आंतर विद्यापीठा क्रॉस कंट्री स्पर्धेचे जेतेपदही त्यांनी प्राप्त केले होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण संचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार सुध्दा त्यांनी सांभाळला आहे. नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. त्यांनी नागपूर आणि गोंडवाणा विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून कार्य केले.

**सामाजिक कार्यातही सक्रिय**

क्रीडा भारती, मैत्री परिवार संस्था, सुर्या फाउंडेशन आदी संस्थांचे ते सक्रिय सदस्य असून महाराष्ट्र अँथलेटिक्स संघटनेचे वरिष्ठ सहसचिव म्हणून त्यांनी आपले योगदान दिले आहे. सध्या ते महाराष्ट्र अँथलेटिक्स संघटनेच्या अँथलीट कमिशनचे समन्वयक असून आत्तापर्यंत त्यांनी ३ आंतरराष्ट्रीय परिसंवादासह अनेक राष्ट्रीय परिसंवादात अभ्यासलेख सादर केले आहे. त्यांनी शारीरिक शिक्षण व प्रशिक्षण पद्धतीवर तीन पुस्तके लिहली असून 'महिला खेळाडूंची भारतातील स्थिती' या विषयावरील राष्ट्रीय शोध कार्यात त्यांनी मुख्य संशोधक म्हणून काम केले आहे.

अनेक आंतरविद्यापीठ आणि राष्ट्रीय स्पर्धांसह ३ आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजनाचा अनुभव त्यांच्या नावे आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नागपूर विभागीय केंद्राची वाटचाल त्यांच्या नेतृत्वात सुरु राहण्यासाठी अनेक मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## गाडीच्या बोनेटवर बसवून गुन्हेगारांची धिंड काढणाऱ्या पुणे पोलिसांना झटका

**वृत्तसंस्था, पुणे**

पुण्याच्या पोलीस विभागासंदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. गाडीच्या बोनेटवर बसून आरोपीची धिंड काढणं पुणे पोलिसांना आता चांगलंच महागात पडल्याचे समोर आलं आहे. राज्य मानवाधिकार आयोगाकडून पुणे पोलिसांना दणका दिला असल्याचे बोललं जात आहे. खून प्रकरणातील संशयीतांची जाहीर दिंड काढल्या प्रकरणी राज्य मानवाधिकार आयोगाकडून मुख्य सचिव डीजीपीसह पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना नोटीस पाठवण्यात आली आहे. पुणे पोलिसांच्या या प्रतापाला राज्य मानवाधिकार आयोगाकडून 'जंगल राज' असा उल्लेख करण्यात आला आहे. दरम्यान, जुलै महिन्यात एका तरुणाची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी चार संशयीतांना अटक केली होती.

## माजी सैनिक, माजी महिला वन कर्मचाऱ्यांसाठी १३६ इन्फंट्री बटालियन पर्यावरण महारमध्ये भरती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय तसेच राज्य वन विभागातील माजी महिला कर्मचारी आणि सशस्त्र दलातील माजी सैनिक यांच्यासाठी १३६ इन्फंट्री बटालियन इको महार येथे विविध पदांसाठी भरती जाहीर करण्यात आली आहे.

ही भरती दोन टप्प्यांत होणार असून पहिला टप्पा १ ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत सकाळी ५ वाजल्यापासून १०९ इन्फंट्री बटालियन (टीए) मराठा एलआय, कोल्हापूर येथे, तर दुसरा टप्पा ८ ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत सकाळी ५ वाजल्यापासून एआरओ मैदान, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

भरतीअंतर्गत ज्युनिअर कमिशन्ड ऑफिसर पदाच्या ४, सोल्जर (जनरल ड्युटी) पदाच्या १६२ जागा (फक्त महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांसाठी) तसेच ट्रेड्समनच्या १५ जागा भरल्या जाणार आहेत. ट्रेड्समनमध्ये सोल्जर क्लर्क - ७, हेअर ड्रेसर - १, मेस कीपर - १, स्टीवर्ड - १, हाऊस कीपर - १, शेफ कम्युनिटी - २ आणि वॉशरमन - २ या पदांचा समावेश असून या पदांसाठी अखिल भारतीय स्तरावर भरती होणार आहे.

**असे आहेत पात्रतेचे निकष**

सशस्त्र दलातील पेन्शनधारक माजी सैनिक तसेच पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय आणि राज्य वन विभागातील किमान २० वर्षे सेवा केलेल्या माजी महिला कर्मचारी या भरतीसाठी पात्र असतील. माजी सैनिक व माजी महिला कर्मचाऱ्यांसाठी किमान वयोमयार्दा नाही. मात्र भरतीच्या तारखेपर्यंत सेवामुक्ती अथवा निवृत्ती होऊन पाच वर्षांच्या आत भरती होणे आवश्यक आहे.

उमेदवारांची वैद्यकीय श्रेणी शेप-क असावी, चारित्र्य अनुकरणीय व चांगले असावे तसेच कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी प्रकरणात सहभाग नसावा. निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल.

माजी सैनिकांसाठी किमान उंची १६० सेंमी (गोरखा, गढवाली व आसामी उमेदवारांसाठी १५२ सेंमी), तर वने व हवामान बदल मंत्रालय आणि वन विभागाच्या माजी महिला कर्मचाऱ्यांसाठी १५० सेंमी निश्चित करण्यात आली आहे. माजी सैनिकांचे किमान वजन ५० किलो, तर माजी महिला कर्मचाऱ्यांचे ४२ किलो असावे. माजी सैनिकांसाठी छातीचे मोजमाप ८२ सेंमी व किमान ५ सेंमी विस्तार आवश्यक असून माजी महिला कर्मचाऱ्यांची छाती किमान ५ सेंमी विस्तारण्यास सक्षम असावी.

आवश्यक असणार हे कौशल्य माजी सैनिकांच्या भरती प्रक्रियेत कागदपत्र पडताळणी, एक मैल धाव, ९ फूट खंदक, पुल-अप्स, बॅलन्स बीम, मुलाखत आणि वैद्यकीय तपासणीचा समावेश आहे. माजी महिला कर्मचाऱ्यांसाठी कागदपत्र पडताळणी, मुलाखत, वनीकरण व रोपवाटिका विषयक कौशल्य चाचणी आणि वैद्यकीय तपासणी होईल.

निवड गुणवत्ता आणि रिक्त पदांच्या आधारे केली जाईल. इको टेरिटोरियल आमीर्तील सेवा पेन्शनपात्र राहणार नाही. सुरुवातीला दोन वर्षांसाठी नियुक्ती केली जाईल. कामगिरीच्या आधारे एका वेळी एक वषार्ची मुदतवाढ दिली जाऊ शकते. माजी सैनिक जेसीओंना वयाच्या ५५ वर्षांपर्यंत, तर इतर माजी सैनिकांना ५० वर्षांपर्यंत सेवा देता येईल. माजी सैनिक जेसीओंना एनबी सुभेदार म्हणून तर, माजी सैनिकांना शिपाई म्हणून नियुक्त केले जाईल व ते कुठेही सेवा देण्यास बांधील राहतील. एकदा भरती झाल्यावर अयोग्य आढळल्यास संबंधित व्यक्ती सेवामुक्त करण्यास पात्र राहील. सध्या मिळत असलेली पेन्शन अबाधित राहील.

**खालील कागदपत्र अवश्यक**

भरतीसाठी उमेदवारांनी पीपीओची मूळ प्रत, डिस्चार्ज बुक (मूळ व स्वयंप्रमाणित प्रत), अधिवास प्रमाणपत्र (मूळ व स्वयंप्रमाणित प्रत), माजी सैनि ओळखपत्र, आधार कार्ड (मूळ व स्वयंप्रमाणित प्रत), अलीकडील रंगीत पासपोर्ट आकाराची १० छायाचित्रे आणि शैक्षणिक प्रमाणपत्रे सोबत आणावीत. कागदपत्रे व प्रमाणपत्रांमध्ये खाडाखोड स्वीकार्य नसून त्यामुळे उमेदवारी रद्द होईल. भरती मेळाव्यादरम्यान मोबाईल फोनला परवानगी नाही. भरती मेळावा आयोजित करणारी संस्था, मेळाव्यादरम्यान उमेदवारांना झालेल्या कोणत्याही अपघात वा दुखापतीसाठी जबाबदार राहणार नाही.

भरती प्रक्रिया पूर्णपणे मोफत असून कोणालाही लाच देऊ नये तसेच दलालांपासून सावध राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. खोटी कागदपत्रे किंवा चुकीची माहिती दिल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नमूद ठिकाणी, दिनांकांना व वेळेवर हजर न होणाऱ्या उमेदवारांना भरती मेळाव्यात सहभागी होऊ दिले जाणार नाही. अधिक माहितीसाठी ९१६८१६८१३६ या क्रमांकावर संपर्क साधावा.